


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३०८ ■ सोमवार, दि.१८ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# अकोलेकरांना आगीत टाकण्याचा उद्योग.....

## शहर हिरवेगार करण्यासाठी आले होते १० कोटी
## मनपाने साडेसहा कोटींचा केला सिमेंट रस्ता
## खासदार अनुप धोत्रे यांचे दुर्लक्ष तर झाले नाही ना

प्रतिनिधी १८ मे

**अकोला :** अकोलेकरांना उन्हाळ्यात गारवा मिळावा, शहर हिरवेगार व्हावे यासाठी केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल या विभागाने दहा कोटींचा निधी दिला होता. या दहा कोटींच्या निधीतून 'नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम' राबवायचा होता. म्हणजे हवेची गुणवत्ता सुधारणा करायची होती. या निधीतून शहरात झाडे लावणे, मियावाकी अर्बन फॉरेस्ट तयार करणे, जंक्शन्सचे आधुनिकीकरण करणे आणि ईव्ही चार्जिंग स्टेशन्स उभारणे, स्मशान भूमित स्वच्छ इंधनाची सोय करणे या उपाययोजना करायच्या होत्या. पण, या दहा कोटींपैकी साडेसहा कोटी रुपयांचा सिमेंट काँक्रीट रोड तयार करुन अकोला महापालिकेने अकोलेरांना उन्हाळ्यातील तप्त आगीत ढकलले आहे. या निधीतून आम्ही ६ कोटी ४६ लाखांचे सिमेंट रोड केल्याचा दावा महापालिका अभियंता अजय गुजर यांनी केला आहे. केंद्राच्या निधीचा गैरवापर होत असताना खा.अनुप धोत्रे यांना गृहित धरल्या गेले की त्यांचे दूर्लक्ष झाले असा प्रश्न






उपस्थित होतो. एकिकडे केंद्र सरकारचा 'नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम' देशातील १०३ शहरांमध्ये वायू प्रदूषण कमी करण्यात यशस्वी ठरत असताना, अकोला महानगरपालिकेत मात्र या योजनेचा पुरता बट्ट्याबोळ उडाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. अकोल्याची हवा शुद्ध करण्यासाठी, प्रदूषण रोखण्यासाठी आणि मियावाकी जंगले उभारण्यासाठी केंद्र सरकारकडून मिळालेल्या १० कोटी रुपयांच्या निधीपैकी तब्बल साडेसहा कोटी रुपये मनपा प्रशासनाने चक्क सिमेंट काँक्रीटचे रस्ते बांधण्यावर उधळले. अकोला शहराचा पारा सध्या ४६ अंशांवर पोहोचला असून, शहराची लाहीलाही होत असताना अशा प्रकारे पर्यावरणाच्या निधीची उघड उघड लूट करणे म्हणजे अकोलेकरांच्या मानवी हक्कांवर गदा आणण्याचाच प्रकार आहे. यामुळे दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम अंतर्गत अकोल्याला हवा शुद्धीकरणाच्या उपाययोजनांसाठी १० कोटींचा निधी मिळाला होता. या निधीतून शहरात झाडे लावणे, मियावाकी अर्बन फॉरेस्ट तयार करणे, जंक्शन्सचे आधुनिकीकरण करणे आणि ईव्ही चार्जिंग स्टेशन्स उभारणे बंधनकारक होते. मात्र, महापालिकेच्या बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अजय गुजर यांच्या देखरेखीखाली या नियमांना केराची टोपली दाखवण्यात आली. तत्कालीन आयुक्तांनी कोणतीही शहानिशा न करता या निधीतून साडेसहा कोटींचे सिमेंट रस्ते बनवण्यास मंजुरी दिली. सिमेंटच्या रस्त्यांमुळे शहराचे तापमानात वाढ होत असताना, पर्यावरण पूरक कामांचा पैसा कंत्राटदारांचे खिसे भरण्यासाठी रस्ते कामांवर का वळवण्यात आला ? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

### देशात यश, अकोल्यात मात्र 'भोंगळ' कारभार!

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल या विभागाने देशातील १३० शहरांपैकी १०३ शहरांमध्ये प्रदूषण पातळीत मोठी घट झाली आहे. ६४ शहरांनी २० टक्क्यांपेक्षा जास्त सुधारणा केली आहे. या शहरांनी रस्त्यावरील धूळ रोखण्यासाठी आधुनिक उपाययोजना केल्या, स्मशानभूमींमध्ये स्वच्छ इंधनाचा वापर सुरू केला गेला. मात्र, अकोला महापालिकेच्या नाकर्तेपणामुळे आणि भोंगळ कारभारामुळे अकोला या चांगल्या कामगिरीपासून वंचित राहिले असून, उलट येथील निधी लाटण्याचा प्रकार उघडकीस आला आहे.आणि अकोलेकरांना आज जे चटके सहन करावे लागत आहे त्याला महापालिकेचा भोंगळ कारभार जबाबदार आहे.

### अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करा!

हवेच्या गुणवत्तेशी संबंधित निधी भलत्याच कामांसाठी वापरून अकोलेकरांना प्रदूषणाच्या खाईत लोटणाऱ्या महापालिका आयुक्त, बांधकाम विभागाचे अधिकारी आणि प्रामुख्याने कार्यकारी अभियंता अजय गुजर यांच्या संपूर्ण कारभाराची उच्चस्तरीय चौकशी होण्याची गरज आहे. अकोल्यातील जागृत नागरिकांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या गंभीर गैरव्यवहाराविरोधात थेट न्यायालयात आणि मानवी हक्क आयोगाकडे धाव घेण्याचा इशारा दिला आहे. तर खा. अनुप धोत्रे यांचे या सर्व प्रकरणाकडे दूर्लक्ष झाले की त्यांना गृहित धरले गेले असा प्रश्न उपस्थित होत आहे.

नीट पेपरफूट प्रकरण

# शिवराज मोटेगावकर सीबीआयच्या ताब्यात



प्रतिनिधी १८ मे

**पुणे :** नीट पेपरफुटी प्रकरणी लातूरातून एक मोठी बातमी समोर आली आहे. रविवारी लातूर येथील एका प्राख्यात नीट क्लास संचालक शिवराज मोटेगावकर यांची ११ तास चौकशी करण्यात आली होती. त्यानंतर सोमवारी त्यांना सीबीआयने ताब्यात घेतले आहे. शिवराज मोटेगावकर हे आरसीसी कोचिंग क्लासेसचे संचालक आहेत. लातूर, पुण्यातल्या चौकशीनंतर मोटेगावकर यांना सीबीआयने ताब्यात घेतले आहे.





लातूर येथील प्राध्यापक एस.पी. कुलकर्णी या प्राध्यापकाची मास्टर माईंड म्हणून माहिती समोर आल्यानंतर सीबीआयचे पथक लातूर येथे दाखल झाले होते व त्यांनी एका प्रख्यात क्लास चालकाची ११ तास कसून चौकशी केली. यामुळे लातूरच नव्हे तर राज्यभरात खाजगी नीट क्लास चालकांमध्ये खळबळ उडाली आहे. लातूरमधील पेपरफुटी प्रकरणाच्या धागेदोऱ्यानंतर सीबीआयने या प्रकरणाचा तपास वेगाने सुरू केला असून, आता मोटेगावकर यांना ताब्यात घेण्यात आले आहे. मोटेगावर यांच्या आरसीसी क्लासमध्ये शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीची आणि तिच्या वडिलांची देखील सीबीआयकडून चौकशी केली जाते आहे. मोटेगावकर यांच्याकडून नीटचे प्रश्न आणि त्या प्रश्नांची उत्तरे ज्यांना मिळाल्याचा संशय आहे ते विद्यार्थी आणि पालक देखील सीबीआयच्या रडारवर आहेत. शिवराज मोटेगावकर यांच्या क्लासेसच्या राज्यासह देशात शाखा आहेत, यामध्ये नांदेड कनेक्शन समोर आली आहे, मोटेगावकरांच्या क्लासचा यामध्ये काही संबंध आहे का याचा तपास केला जात आहे.

### नांदेडच्या कोचिंग क्लासला दिली सुट्टी

लातूरमध्ये झालेल्या चौकशीनंतर नांदेडच्या कोचिंग क्लासेसला सुट्टी दिली आहे. शहरातील कोचिंग क्लासेस येथे सकाळी विद्यार्थी आले त्यानंतर या सर्व विद्यार्थ्यांना आजपासून सुट्ट्या लागल्या असं कारण सांगत सर्व विद्यार्थ्यांना घरी पाठवलेले आणि त्यानंतर शटरला कुलूप लावत मुख्य कार्यालय बंद ठेवलेले आहे. काल लातूर येथे देखील याच खाजगी कोचिंग क्लासेसची चौकशी झाली त्यानंतर त्याच खाजगी कोचिंग क्लासेसला अचानकपणे सुट्टी ही घोषित करण्यात आली आहे त्यामुळे सीबीआयच्या चौकशीच्या भीतीने मुख्यालय बंद ठेवले की काय, अशी चर्चा आता नांदेडमध्ये सुरू झाली आहे.

### निकालाआधीच १८० पैकी १८० गुणांची जाहिरात झळकली!

◆ संशयाची सुई गडद झाल्याने मुलीसह आई-वडिलांना उद्या मंगळवारी पुणे येथील सीबीआय कार्यालयात हजर राहण्याचे समन्स दिल्याची माहिती आहे. दरम्यान, सीबीआयकडून झालेल्या चौकशीमुळे शैक्षणिक वर्तुळात खळबळ उडाली आहे. त्यातच या चौकशीच्या फेऱ्यात असलेल्या विद्यार्थिनीचा फोटो छापून नांदेडमधील एका खासगी कोचिंग क्लासने कमाल करत सोशल मीडियावर जाहिरातबाजी केली आहे. या जाहिरातीत संबंधित मुलीला केमिस्ट्री या विषयात १८० पैकी १८० गुण मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, नीट परीक्षेचा अधिकृत निकाल अद्याप जाहीर झालेला नसतानाही, या क्लासने निकालापूर्वीच हे गुण मिळाल्याचे भाकीत जाहिरातीत वर्तवल्याने सगळ्यांच्याच भुवया उंचावल्या आहेत.



# ट्रम्प यांच्या धमकीनंतर बाजारात भूकंप!

◆ सेन्सेक्स १००० अंक धारातीर्थ, डॉलरपुढे रुपयाची नांगी

प्रतिनिधी १८ मे

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील वाढता तणाव आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे सोमवार, आठवड्याच्या पहिल्या व्यापार दिवशी, देशांतर्गत शेअर बाजारात जोरदार घसरण झाली. १८ मे रोजी बाजारातील सुरुवातीच्या व्यवहारात बीएसई सेन्सेक्स १००० हून अधिक अंकांनी कोसळला तर, नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा निफ्टी ३०० हून अधिक अंकांनी खाली आला. दरम्यान, रुपयानेही डॉलरच्या तुलनेत आतापर्यंतचा नीचांक गाठला. यामुळे गुंवणूकदारांसाठी हा दिवस काळा ठरला आहे. सोमवारी सकाळी ९.५० वाजता मुंबई शेअर बाजार १,०१०.६४ अंक किंवा १.३४ टक्के घसरणीसह ७४,२२७.३५ अंकांवर ट्रेड करत होता. त्याचवेळी, निफ्टी५० निर्देशांक ३०३.२५ अंकांनी किंवा १.२८ टक्के घसरून २३,३४०.२५ अंकांवर खाली आला. अशाप्रकारे, सुरुवातीच्या घसरणीमुळे बीएसईवर सूचिबद्ध कंपन्यांचे मार्केट-कॅप ७ लाख कोटींनी कमी होऊन ४५४ लाख कोटी रुपये राहिले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे की, इराणसाठी वेळ संपत चालली आहे आणि त्यांनी लवकरच निर्णय घेतला नाही, तर त्यांच्याकडे काहीही उरणार नाही.

### डॉलरसमोर रुपयाचा नवीन ऐतिहासिक नीचांक

अमेरिकी डॉलरसमोर भारतीय रुपयाची घसरण थांबण्याची चिन्हे दिसत नसून सोमवार पुन्हा एकदा भारतीय चालनाने ऐतिहासिक नीचांकी पातळी गाठली. इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या किमती आणि बॉण्ड यील्ड्समध्ये झालेल्या वाढीमुळे रुपयाची शंभरीच्या दिशेने कूच चालू राहिली. सकाळच्या सत्रात रुपया ०.२ टक्के घसरून ९६.१८ वर आला असून सलग पाचव्या सत्रात रुपयाने घसरणीचा आलेख कायम ठेवला आहे.

# यंदा वेळेआधीच मान्सूनचे केरळात होणार आगमन

प्रतिनिधी १८ मे

**पुणे :** यंदा नैऋत्य मान्सून वेळेआधीच केरळात दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. सामान्यत: १ जूनच्या सुमारास पोहोचणारा मान्सून यंदा २६ मे रोजीच केरळ किनारपट्टीवर धडकू शकतो. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्याने मान्सूनचा वेग वाढला आहे. यंदा मान्सूनच्या सुरुवातीच्या टप्प्यात बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात कोणतेही चक्रीवादळ निर्माण झालेले नाही.

त्यामुळे मान्सूनच्या प्रवासात कोणताही मोठा अडथळा येणार नसून तो सुरळीत पुढे सरकणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. तसेच, मान्सून ५ जूनपर्यंत गोव्यात दाखल होण्याची शक्यता असून ६ जूनपर्यंत तो कोकणात पोहोचू शकतो. तसेच ७ जूनपर्यंत पुण्यात मान्सून दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.






## पावसाळ्यापूर्वी स्वच्छतेची कामे व्हावी

**अकोला** : पावसाळ्यापूर्वी स्वच्छतेच्या कामांना महापालिका तसेच नगर पालिका, नगर पंचायत स्तरावर गती देणे आवश्यक आहे. पावसाळ्याला आता फार दिवस राहिले नाही. त्यामुळे हा विषय ऐरणीवर आला आहे. स्थानिक पातळीवर स्वच्छतेच्या कामांना प्राधान्य दिले नाही तर नागरिकांच्या अडचणी वाढू शकतात. त्यामुळे याकडे दुर्लक्ष करू नका अशी जनभावना आहे.

नाल्यांची स्वच्छता वेळीच झाली नाही तर पावसाचे पाणी आणि रस्त्यावर तसेच लोकांच्या घरात शिरण्याची शक्यता असते. त्यामुळे नाल्या, मोठे नाले यांची सफाई आतापासूनच करण्याकडे स्थानिक स्वराज्य संस्थांनी लक्ष देण्याची गरज आहे, कारण एकदा पाऊस सुरू झाला की लोकांच्या समस्यांना मर्यादा राहात नाही.

# भारतीय जनगणनेचा इतिहास !

भारतातील जनगणनेला प्राचीन काळापासून सुरूवात झाली असून, स्वातंत्र्योत्तर काळात अधिक संघटित झाली. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी लॉर्ड रिपन यांच्या काळात देशात पहिली संपूर्ण आणि एकाच वेळी जनगणना पार पडली. त्यानंतर दर १० वर्षांनी नियमितपणे जनगणना करण्याची पद्धत सुरू झाली.

**भारतातील जनगणनेच्या इतिहासाचे प्रमुख टप्पे खालीलप्रमाणे आहेत..**

१. प्राचीन व मध्ययुगीन काळ अर्थशास्त्र व आईन-ए-अकबरी : मौर्य काळात (चाणक्य यांच्या 'अर्थशास्त्र') आणि मुघल काळात (अबुल फजल यांच्या 'आईन-ए-अकबरी') कर गोळा करण्यासाठी व लष्करी ताकदीचा अंदाज घेण्यासाठी लोकसंख्येची आकडेवारी गोळा केली जात असे.

२. ब्रिटिश काळ (१८७२ - १९४१) पहिली जनगणना (१८७२) : ब्रिटिश व्हाईसरॉय लॉर्ड मेयो यांच्या कार्यकाळात भारतात पहिली जनगणना झाली. मात्र, ती संपूर्ण देशात एकाच वेळी झाली नव्हती. पहिली संपूर्ण जनगणना (१८८१) : संपूर्ण भारतात एकाच वेळी मोजणी करण्याची सुरुवात १८८१ पासून झाली. त्यानंतर १९४१ पर्यंत प्रत्येक दशकात (दर १० वर्षांनी) जनगणना करण्यात आली. जातनिहाय जनगणना : १८८१ ते १९३१ पर्यंतच्या जनगणनेमध्ये जातींची आकडेवारी गोळा केली जात असे. (१९३१ ची जनगणना ही ब्रिटीश काळातील शेवटची जातनिहाय जनगणना होती).

३. स्वातंत्र्योत्तर काळ (१९५१ - आजपर्यंत) पहिली स्वतंत्र जनगणना (१९५१)



: स्वातंत्र्यानंतर १९५१ मध्ये पहिली जनगणना करण्यात आली. जनगणना कायदा १९४८ अंतर्गत या प्रक्रियेला कायदेशीर अधिष्ठान देण्यात आले. हे कार्य गृह मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या 'रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्त' यांच्या नेतृत्वाखाली पार पडते. २०११ ची जनगणना ही भारताची १५ वी आणि स्वातंत्र्यानंतरची ७ वी जनगणना होती. तसेच २०२१ मध्ये होणारी जनगणना कोविड-१९ साथीच्या आजारामुळे पुढे ढकलण्यात आली होती. केंद्र सरकारने २०२७ च्या जनगणनेची प्रक्रिया व मोहीम हाती घेतली असून, यासाठी गृह मंत्रालय आणि अधिकृत जनगणना पोर्टल द्वारे नागरिकांसाठी डिजिटल स्व-नोंदणी सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

जनगणना म्हणजे एका विशिष्ट प्रदेशातील (उदा., देश, राज्य, शहर) लोकांची मोजणी करणे. हे दर १० वर्षांनी केले जाते, ज्यात त्या प्रदेशातील प्रत्येक व्यक्तीची गणना करून त्यांचे वय, लिंग, शिक्षण, व्यवसाय, राहण्याची जागा, इत्यादी माहिती गोळा केली जाते. जनगणना ही एखाद्या प्रशासकीय संस्थेद्वारे केलेल्या प्रदेशाच्या एकूण लोकसंख्येचे सर्वेक्षण असते. जनगणनेमध्ये एखाद्या प्रदेशातील लोकांचे वय, लिंग, आर्थिक स्थिती, शिक्षण आणि गुणधर्म याबद्दल माहिती गोळा केली जाते, जी नंतर विविध उद्देशांसाठी वापरली जाऊ शकते. जनगणनेतून मिळणाऱ्या माहितीचा उपयोग सरकारला विकास योजना तयार करण्यासाठी, संसाधने वाटून देण्यासाठी, आणि सामाजिक धोरणे आखण्यासाठी होतो. लोकसंख्या जनगणना (सर्वांसाठी), गृहनिर्माण जनगणना (घरांबद्दल माहिती), आणि इतर अनेक प्रकारचे जनगणना असू शकतात, जसे की शेती जनगणना, व्यवसाय जनगणना आदी. जनगणनेमुळे लोकांना त्यांच्या हक्कांबद्दल जागरूक होण्यास मदत होते आणि त्यांच्या समस्या सरकारपर्यंत पोहोचतात.

भारत दर १० वर्षांनी जनगणना करतो, आणि ती जगातील सर्वात मोठी प्रशासकीय प्रक्रिया मानली जाते. जनगणना सामान्यतः दर १० वर्षांनी होते. जनगणनेमध्ये दिलेल्या देशाची संपूर्ण लोकसंख्या आणि घरांचा साठा मोजला जातो आणि त्याच्या मुख्य वैशिष्ट्यांची माहिती गोळा केली जाते. हे प्रामुख्याने भौगोलिक, लोकसंख्याशास्त्रीय, सामाजिक आणि आर्थिक तसेच घरगुती, कौटुंबिक आणि गृहनिर्माण वैशिष्ट्ये आहेत. १८७२ मध्ये, लॉर्ड मेयोच्या राजवटीत भारतात पहिली जनगणना करण्यात आली. आज भारतात सुमारे ३,००० जाती आणि २५,००० पोटजाती आहेत. नेपाळी बौद्ध धर्म, ख्रिश्चन धर्म, इस्लाम, यहुदी आणि शीख धर्म यांसारख्या भारतीय उपखंडातील इतर प्रांतांमध्ये आणि धर्मांमध्येही जाती-आधारित फरक प्रचलित आहेत. २०११ पर्यंत भारताची दशवार्षिक जनगणना १५ वेळा आयोजित केली गेली आहे. २०२७ ची भारताची जनगणना, किंवा १६ वी भारतीय जनगणना, दोन टप्प्यात केली जाणार आहे, एक घरांची यादी टप्पा आणि दुसरा लोकसंख्या गणना टप्पा.

### जगात जनगणना करण्याचा उद्देश काय होता?

अमेरिकन संविधानाच्या कलम १, कलम २ मध्ये असे म्हटले आहे की राज्यांमधील प्रतिनिधींचे वाटप दर १० वर्षांनी केले पाहिजे. म्हणूनच, आपल्या राष्ट्राच्या संस्थापकांनी ठरवलेल्या दशकीय जनगणनेचा मूळ कायदेशीर उद्देश वाटप हा आहे. भारतीय संविधानाच्या कलम २४६ अंतर्गत जनगणना हा केंद्रशासित विषय आहे. जनगणना कायदा १९४८ च्या तरतुदींनुसार, भारताची जनगणना केली जाते. भारतात, जनगणना १० वर्षांनी एकदा केली जाते. जाती जनगणना म्हणजे भारताच्या लोकसंख्येच्या जातीनिहाय विभाजनाचा समावेश या लोकसंख्याशास्त्रीय अभ्यासाचा उद्देश दिलेल्या प्रदेशात किंवा देशामध्ये विविध जाती गटांच्या वितरणावर सर्वसमावेशक डेटा गोळा करणे हा आहे.

### जनगणना कायदा म्हणजे काय?

कोणत्याही व्यक्तीला जनगणना अधिकाऱ्याने आपले कर्तव्य बजावताना केलेले कोणतेही पुस्तक, नोंदणी किंवा रेकॉर्ड किंवा कलम १० अन्वये वितरीत केलेले कोणतेही वेळापत्रक आणि भारतीय पुरावा कायदा, १८७२ मधील काहीही विपरित असले तरी, अशा कोणत्याही पुस्तकात, नोंदवही, रेकॉर्ड किंवा वेळापत्रकात कोणतीही नोंद न करण्याचा अधिकार असणार नाही.

.......

### लोकसंख्या शिक्षण म्हणजे काय?

स्टीफन विडरमन यांच्या मते, 'लोकसंख्या शिक्षण ही अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे विद्यार्थी लोकसंख्या प्रक्रिया, लोकसंख्येची वैशिष्ट्ये, लोकसंख्येतील बदलाचे स्रोत आणि या प्रक्रियांचे परिणाम, वैशिष्ट्ये आणि स्वतःसाठी, त्याचे कुटुंब, समाज आणि जगासाठी होणारे बदल यांचे स्वरूप आणि महत्त्व यांचा अभ्यास आणि विश्लेषण करतो.'

# इराण-अमेरिका संघर्ष : भारतासाठी धडा आणि रणनीती

गेल्या काही दशकांत अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष हा जागतिक राजकारणातील सर्वात संवेदनशील आणि अस्थिर विषय राहिला आहे. थेट युद्ध झाले नसले तरी, त्यांच्यातील छुपं युद्ध , आर्थिक निर्बंध आणि लष्करी तणाव यांचा संपूर्ण जगावर परिणाम होतो. मध्य पूर्व हा भारताच्या शेजारील अत्यंत महत्त्वाचा भाग असल्याने, या संघर्षातून भारताने स्वतःच्या सुरक्षेसाठी आणि अर्थव्यवस्थेसाठी काही अत्यंत महत्त्वाचे धडे घेणे गरजेचे आहे.

खालील मुद्द्यांच्या आधारे भारताने या संघर्षातून काय शिकले पाहिजे, तर ऊर्जेची स्वावलंबिता -इराण-अमेरिका तणावाचा सर्वात पहिला आणि थेट फटका कच्च्या तेलाच्या किमतींना बसतो. भारत आपल्या गरजेच्या जवळपास ८०टक्के तेल आयात करतो, ज्यातील मोठा हिस्सा मध्य पूर्वेतून येतो.

**धडा** : भारताने केवळ खाडी देशांवर अवलंबून न राहता आपल्या ऊर्जेच्या स्रोतांचे विविधीकरण केले पाहिजे. रशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेकडून तेल खरेदी वाढवणे, तसेच देशांतर्गत हरित ऊर्जा, सौर ऊर्जा आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वेग वाढवणे हाच यावर कायमस्वरूपी तोडगा आहे.

**आर्थिक निर्बंधांचा सामना करण्याची तयारी**

अमेरिकेने इराणवर लादलेल्या आर्थिक निर्बंधांमुळे भारताला इराणकडून स्वस्त दरात मिळणारे तेल बंद करावे लागले होते. तसेच चाबहार बंदराच्या विकासातही अडचणी आल्या.

**धडा :** आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणताही देश कधीही निर्बंधांचा सामना करू शकतो. त्यामुळे जागतिक वित्तीय प्रणालीवर संपूर्णपणे अवलंबून राहणे धोक्याचे आहे.

**कृती :** भारताने 'रुपी ट्रेड' म्हणजेच भारतीय रुपयात व्यापार करण्याची यंत्रणा अधिक मजबूत केली पाहिजे, जेणेकरून भविष्यात डॉलरच्या वर्चस्वाला पर्याय निर्माण करता येईल.

**'आत्मनिर्भरता' आणि लष्करी आधुनिकीकरण**

इराणने अमेरिकेसारख्या महासत्तेचा सामना करण्यासाठी स्वतःचे क्षेपणास्त्र तंत्रज्ञान आणि ड्रोन तंत्रज्ञान विकसित केले. तंत्रज्ञानाच्या बाबतीत दुसऱ्यांवर अवलंबून राहिल्यास युद्धाच्या काळात पुरवठा साखळी खंडित होऊ शकते.

**धडा** : संरक्षण क्षेत्रात परदेशी देशांवर (रशिया किंवा अमेरिका) अवलंबून राहणे भारतासाठी घातक ठरू शकते.

**कृती** : 'मेक इन इंडिया' अंतर्गत भारताने स्वतःची प्रगत शस्त्रे, लढाऊ विमाने आणि सायबर सुरक्षा प्रणाली विकसित करणे गरजेचे आहे. 'आत्मनिर्भर भारत' केवळ घोषणा न राहता लष्करी वास्तव बनले पाहिजे.



**मुत्सद्देगिरी आणि संतुलित परराष्ट्र धोरण -**

या संघर्षात भारताचे अमेरिकेशी मजबूत धोरणात्मक संबंध आहेत, तर इराणशी ऐतिहासिक आणि धोरणात्मक (चाबहार बंदर, मध्य आशियात जाण्याचा मार्ग) संबंध आहेत.

**धडा :** कोणत्याही एका गटात सामील न होता स्वतःचे राष्ट्रीय हित सर्वोच्च ठेवणे हाच सर्वोत्तम मार्ग आहे. भारताने आपली 'धोरणात्मक स्वायत्तता' जपली पाहिजे. अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता आणि इराणशी संबंध न तोडता दोन्ही बाजूंचा समतोल राखण्याची कला भारताला अधिक विकसित करावी लागेल.

**अनिवासी भारतीयांची सुरक्षा-**

मध्य पूर्व देशांमध्ये (यूएई, सौदी अरेबिया, कतार इ.) कोट्यवधी भारतीय कामगार राहतात. इराण-अमेरिका युद्ध भडकल्यास या संपूर्ण क्षेत्रातील भारतीयांचे जीवन आणि रोजगार धोक्यात येऊ शकतो.


**धडा** : आणीबाणीच्या प्रसंगी आपल्या नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याची क्षमता नेहमी सज्ज ठेवली पाहिजे.

भारताने यापूर्वी 'ऑपरेशन राहत' किंवा 'ऑपरेशन गंगा' सारख्या मोहिमा राबवल्या आहेत. भविष्यातील मोठ्या संकटासाठी हवाई दल आणि नौदलाची सज्जता अधिक वाढवणे आवश्यक आहे.

इराण-अमेरिका संघर्षातून भारतासाठी सर्वात मोठा धडा हाच आहे की, 'जागतिक राजकारणात कोणीही कायमचा मित्र किंवा शत्रू नसतो, फक्त देशाचे हित कायम असते.' भारताला जर जागतिक महासत्ता बनायचे असेल, तर आपल्याला ऊर्जेच्या बाबतीत स्वावलंबी, संरक्षणाच्या बाबतीत आत्मनिर्भर आणि परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत अत्यंत चतुर व संतुलित राहावे लागेल. जागतिक संघर्षाच्या आगीत स्वतःचे हित कसे जपावे, याचा हा एक उत्तम वस्तुपाठ आहे.

### दिन विशेष

## २० व्या शतकातील सर्वश्रेष्ठ तत्त्वचिंतक : बर्ट्रंड रसेल!



आज जयंती

बर्ट्रंड रसेलचे संपूर्ण नाव बर्ट्रंड आर्थर विल्यम रसेल, तिसरा अर्ल रसेल. रसेलचा जन्म इंग्लंडच्या आग्नेय वेल्स विभागातील ट्रेलेक येथे १८ मे १८७२ रोजी झाला तर मृत्यू त्याच विभागातील पेन्रीन, डाइड्राइथ येथे रोजी झाला. 'पहिल्या रिफॉर्म बिला'चे उद्गाते म्हणून प्रसिद्ध असलेल्या ब्रिटिश पंतप्रधान लॉर्ड जॉन रसेल, पहिले अर्ल रसेल यांचा नातू म्हणजे बर्ट्रंड रसेल. गणित, भूमिती, विज्ञान या विषयातील वैज्ञानिक जगतात आणि शुद्ध तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात रसेलचे स्थान उच्चकोटीचे होतेच; पण त्याहीपेक्षा सामाजिक व राजकीय लेखन, चिंतनामुळे रसेल जगभरातील इंग्रजी जाणणाऱ्या सुशिक्षितात लोकप्रिय झाला.

'विसाव्या शतकातील सर्वश्रेष्ठ तत्वचिंतक आणि जनविवेकवेत्ता' म्हणून बर्ट्रंड रसेलला ओळखले जाते. या उपाधीत काहीच वावगे वाटू नये, इतके सर्व क्षेत्रातील रसेलचे लेखन अत्युच्च कोटीचे आहे. मानव जमातीला जितके सल्ले रसेल देऊ शकला, तितके सल्ले अन्य कोणत्याही 'विवेकवादी' विचारवंताने दिलेले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. रसेलने लेखन-चिंतनाद्वारे साऱ्या जगाला विवेकवादाचे, बुद्धिवादाचे जणू शिक्षणच दिले. व्यापक अर्थाने 'जागतिक शिक्षक' अशीही उपाधी रसेलला सार्थपणे जोडता येते. मानवातील विधायक प्रेरणांचा विकास आणि विघातक प्रेरणांचे दमन हेच शिक्षणाचे उद्दिष्ट आहे, हे रसेलच्या शिक्षणविषयक चिंतनाचे मध्यवर्ती सूत्र आहे.

गणितज्ज्ञ, तत्ववेत्ता, साहित्यिक, न्यायप्रिय, मानवतावादी अशा बहुविध रुपांत विसाव्या शतकातल्या विचारविश्वावर रसेलने आपला ठसा उमटविला. विध्वंसक अण्वस्त्र स्पर्धेत उतरलेल्या युद्धखोर देशांना प्रखर विरोध करत त्याने, बुद्धिप्रामाण्यवाद अधिष्ठित जीवनाचे प्रारुप शांतताप्रिय समाजापुढे, किंबहुना साऱ्या जगापुढे ठेवले.

### रसेलच्या दोन मूलभूत प्रेरणा

रसेलच्या तात्त्विक, सामाजिक व राजकीय भूमिकेनुसार मानवात दोन मूलभूत प्रेरणा असतात : विधायक आणि विघातक. विधायक प्रेरणेचा आविष्कार विज्ञान, कला, प्रेम, मैत्री व तत्त्वज्ञान यातून जाणवतो, तर विघातक प्रेरणेचा दारुण अनुभव असूया, मत्सर, स्पर्धा, हिंसा यातून येतो. विधायक प्रेरणांचा विकास आणि विघातक गोष्टींना प्रखर विरोध हे मानवी जीवनाचे स्वरूप आहे. म्हणूनच विधायक प्रेरणांचा विकास करण्याचे सामर्थ्य आणि विघातक प्रेरणांचे दमन करण्याची शक्ती प्रत्येक व्यक्तीत निर्माण करणे, हेच शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे. शिक्षणाच्या या ध्येयाचा अंतिम आविष्कार 'चांगला माणूस बनणे' हाच असला पाहिजे, असा त्याचा आग्रह आहे. म्हणूनच तर कोणतीही संस्थात्मक रचना रसेलला मान्य नव्हती. 'तो म्हणतो, ज्याची प्रेरणा प्रेमात आहे आणि ज्याचे मार्गदर्शन ज्ञानाने होते, असे जीवन म्हणजे शुभजीवन होय.' हा विचार त्याच्या सामाजिक व नैतिक शिकवणुकीचा गाभा आहे.

# फार्मसी करायचा विचार करताय? सावधान..!

## 89 संस्थांकडून आवश्यक निकषांची पूर्तताच नाही



राज्यात गेल्या काही वर्षांत अक्षरशः पेव फुटलेल्या फार्मसी महाविद्यालयांना अखेर लगाम लावण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. शैक्षणिक वर्ष २०२७-२८ ते २०३०-३१ या कालावधीत राज्यात नव्या बी. फार्मसी आणि डी. फार्मसी महाविद्यालयांना मान्यता देऊ नये, तसेच विद्यमान महाविद्यालयांची प्रवेशक्षमता वाढवू नये, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाला दिले आहेत. राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला.

कोरोनाकाळात फार्मसी अभ्यासक्रमांना अचानक मागणी वाढल्यानंतर राज्यात मोठ्या प्रमाणावर नव्या संस्थांनी उभारणीस सुरुवात केली होती. 'फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया'कडे (पीसीआय) नव्या महाविद्यालयांसाठी अर्जांचा अक्षरशः पाऊस पडला होता. गेल्या तीन वर्षांत पीसीआयने डिप्लोमा अभ्यासक्रमासाठी २२० आणि पदवी अभ्यासक्रमासाठी ९२ नव्या महाविद्यालयांना मान्यता दिली. मात्र, त्यानंतर या संस्थांची तपासणी करण्यात आली असता अनेक महाविद्यालयांकडे आवश्यक पायाभूत सुविधा, प्रयोगशाळा, शिक्षक आणि शैक्षणिक निकषच नसल्याचे उघड झाले. तंत्रशिक्षण संचालनालय आणि तंत्रशिक्षण मंडळाने केलेल्या पाहणीत पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांच्या ३१२ पैकी तब्बल ८९ संस्थांनी आवश्यक निकष पूर्ण केले नसल्याचे समोर आले होते. त्यामुळे या संस्थांना प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेतून वगळण्यात आले होते. मात्र, नंतर न्यायालयीन प्रक्रियेनंतर या संस्थांचा पुन्हा प्रवेश प्रक्रियेत समावेश करण्यात आला.

फार्मसी शिक्षणाच्या वाढत्या संस्थांना विद्यार्थ्यांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचेही स्पष्ट झाले आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये राज्यभरात बी. फार्मसी अभ्यासक्रमासाठी ४६ हजार १०९ जागा उपलब्ध होत्या.

मात्र, प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर केवळ २८ हजार ४१९ जागाच भरल्या. तब्बल १७ हजार ६९० म्हणजेच सुमारे ४८ टक्के जागा रिक्त राहिल्याने नव्या संस्थांच्या गरजेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने कठोर भूमिका घेत नव्या फार्मसी संस्थांना स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर केंद्र सरकार आणि 'फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया' यांनाही याबाबत कळविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. फार्मसी शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी औषधनिर्माण कंपन्यांशी भागीदारी वाढवावी, विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, प्रात्यक्षिके आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देशही बैठकीत देण्यात आले.

### 'कोरोना बूम' नंतर उतरती कळा

कोरोनाकाळात औषधनिर्माण आणि आरोग्य क्षेत्राकडे विद्यार्थ्यांचा मोठा ओढा निर्माण झाला होता. 'फार्मसी' हा रोजगाराच्या दृष्टीने सुरक्षित पर्याय मानला जाऊ लागल्याने अनेक विद्यार्थ्यांनी बी. फार्म आणि डी. फार्म अभ्यासक्रमांकडे धाव घेतली. मात्र, कोरोना संपल्यानंतर अभियांत्रिकी, डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, हेल्थकेअर टेक्नॉलॉजी यांसारख्या नव्या क्षेत्रांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढला.

CNR No.: MHAK06-00-2026 प्रोसेस क्र. 1649/2026 दि.12/05/2026

**जाहीर नोटीस**

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी. क्र. ११७/२०२६** **चौकशी तारीख: १५/०६/२०२६**

**अर्जदार :**
१. **श्रीमती गोदावरी श्रीधर देशमुख,** वय ५८, धंदा: घरकाम रा.मु. आंबोडा, पोस्ट. आकोलखेड ता. अकोट जि. अकोला.
२. **शिल्पा संदिप देशमुख,** वय ३४, धंदा घरकाम, रा. पैलपाडा, ता. जि. अकोला.

**विरूध्द**

**गैरअर्जदार : कोणीही नाही.**

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवासी असुन अर्जदार क्र.१चे पती व अर्जदार क्र. २ वडील नामे श्रीधरराव गोविंदराव देशमुख हे आपले संपुर्ण जिवनकाळात मौजे. आंबोडा, पोस्ट. आकोलखेड ता. अकोट जि. अकोला येथेच राहले व तेथेच दि. २१/०२/२०२६ रोजी मयत झाले आहेत. तसेच मयत श्रीधरराव गोविंदराव देशमुख यांची आई नामे राधाबाई गोविंदराव देशमुख हया दि. ३१/०१/२०११ रोजी आंबोडा, पोस्ट. आकोलखेड ता. अकोट जि. अकोला येथे मयत झाल्या आहेत. मयत श्रीधरराव गोविंदराव देशमुख यांना अर्जदार क्र. १ ते ४ यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानूसार निकाली काढण्यात येईल.

करीता आज दिनांक: १२/०५/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशावरून**
**सहायक अधिक्षक (न्यायीक)**
**दिवाणी न्यायालय (व. स्तर), अकोट, जि. अकोला**

### साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
सोमवार, दि. १८ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## दुर्गा चौकात रपट्याचे काम सुरू

**अकोला :** शहरातील वर्दळीच्या अग्रसेन चौक ते जठारपेठ मार्गावर दुर्गा चौकात पुलावरील रपटयाचे काम सध्या सुरू करण्यात आले आहे. यामुळे या मार्गावरून वाहतूक करणाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे अनेकांना हा रस्ता बंद आहे हे माहीत नसल्याने ते तेथपर्यंत येऊन परत जात आहेत किंवा अन्य पर्यायी मार्गाचा अवलंब करीत आहेत. त्यामुळे याचे काम तातडीने करण्याची मागणी वाहनधारकांमधून होत आहे.

# मंजीतसिंह शीख यांना विदर्भभूषण पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी १८ मे



**अकोला :** ज्येष्ठ सर्वोदयी रामकृष्ण आढे यांनी महात्मा गांधी, विनोबाजी, जयप्रकाश नारायण यांच्या सहवासात राहून भूदान, ग्रामदान, सर्वोदय चळवळीला सर्वस्व समर्पित केले, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष रमेशअण्णा दाणे यांनी केले.

मारूती संस्थान केळीवेळी येथे स्व.रामकृष्ण आढे स्मृती विदर्भभूषण पुरस्कार मनजितसिंह शीख यांना प्रदान करण्यात आला. त्या प्रसंगी बोलत होते. ज्येष्ठ गांधीवादी महेंद्रबाबू गोयनका कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. महाराष्ट्र प्रदेश सर्वोदय मंडळाचे महासचिव बजरंगभाई सोनवणे, भूदान मंडळाचे सचिव एकनाथ डगवार, ग्राममंडळ केळीवेळीचे अध्यक्ष किशोर बुले, सर्वोदय मंडळाचे जिल्हाध्यक्ष बबनराव कानकिरड विचारपीठावर उपस्थित होते.

सर्वप्रथम स्व. रामकृष्ण आढे यांच्या फोटोचे पूजन व हारार्पण करून अभिवादन करण्यात आले.सर्वधर्म प्रार्थनेने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला.प्रास्ताविक डॉ. राजकुमार बुले यांनी केले. अतिथी व पुरस्कारार्थीचा परिचय डॉ. शिवचरणसिंह ठाकुर यांनी करून दिला. सन्मान पत्राचे वाचन डॉ. महेंदसिंग ठाकुर यांनी केले.

गोरक्षा, भूदान, ग्रामदान, महिला सक्षमीकरण व आदिवासी हक्कासाठी लढणाऱ्या कार्यकर्त्याला स्व. रामकृष्ण आढे यांचे स्मृतिपित्यर्थ विदर्भभूषण पुरस्कार दिला जातो. २०२६ चा पुरस्कार सालईबन ता. जळगाव जामोद येथील सर्वोदयी कार्यकर्ते मनजितसिंह शीख यांना मानपत्र, शाल श्रीफळ देऊन प्रदान करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना मंजीत सिंह शीख यांनी स्व. रामकृष्ण आढे यांच्या कार्याला अभिवादन करत बाबा आमटे, जयवंत मठकर आदींच्या प्रेरणेने आपण आदिवासी भागात सर्वोदय विचाराने प्रेरित होऊन पर्यावरण संवर्धन, जलसंवर्धन, निसर्ग रक्षणाचे काम सुरू केले. त्यामागे आढेजींची प्रेरणा होती असे सांगितले.

सलाईबन सारख्या आदिवासी दुर्गम भागात मंजितसिंह शीख या ध्येय वेड्या तरुणाने स्वतःला खपवून घेतले.त्यामुळे आज तो परिसर हिरवागार झाला आहे.तरुणां समोर हा एक आदर्श दीपस्तंभ आहे असे बजरंगभाई सोनवणे म्हणाले. एकनाथ डगवार, किशोर बुले, महेंद्रबाबू गोयनका यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे संचालन सुनील अवचार यांनी केले. आभार प्रदर्शन महेश वसंतराव आढे यांनी केले.

### सर्वोदय विचार प्रबळ करणे मुख्य उद्देश

जिल्ह्याला सर्वोदय विचारांची जुनी परंपरा आहे. हा विचार अधिक प्रबळ व्हावा या उद्देशाने विविध उपक्रम राबविले जातात. ज्येष्ठ सर्वोदयी रामकृष्ण आढे यांचा या चळवळीत सक्रिय सहभाग राहिला आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन युवक तयार झाले. आज ते ही चळवळ पुढे नेत आहेत. तसेच अधिक प्रमाणात हा विचार समाजात पोहोचावा या अनुषंगाने या कार्यक्रमाचे महत्त्व आहे या मुद्यावर भर देण्यात आला.

## धामना येथे नदीकाठी आढळला इसमाचा मृतदेह

**उरळ :** उरळ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील धामना गावातील पूर्णा नदीकाठी एका इसमाचा मृतदेह आढळून आला. हा इसम पूर्णा नदीमध्ये बुडून मरण पावला असल्याची शक्यता आहे. याप्रकरणी उरळ पोलीस स्टेशनमध्ये मर्ग दाखल करण्यात आला आहे.

याबाबत वृत्त असे की, धामना येथे मजूर म्हणून कामाला असलेल्या बाळू मारुती वाघमारे (६५) यांचा आज भागवत पाकदुने यांच्या शेताच्या बाजूला पूर्णा नदीच्या काठावर मृतदेह आढळून आला. हा इसम रायगड जिल्ह्यातून मजुरीच्या कामासाठी धामना येथे आला होता. इसमाची पत्नी कमल बाळू वाघमारे यांच्या फिर्यादीवरून तक्रार नोंदविण्यात आली आहे. याबाबतचा पुढील तपास पोलीस स्टेशनचे ठाणेदार पंकज कांबळे यांच्या मार्गदर्शनात हवालदार सोळंके तसेच बीट जमादार नेमाडे करीत आहेत.

## खरप-पाचपिंपळ गावातील १० वर्षांचा पाणीप्रश्न अखेर मार्गी



प्रतिनिधी १८ मे

**अकोला :** खरप-पाचपिपळ परिसरात अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर अखेर तोडगा निघाला. राहुल खंडारे, नाजुकराव पावसाळे यांच्या घरापासून दिनेश महल्ले, मनोहर बाबर, हरिचंद्र घोगे ते अंगणवाडीपर्यंत नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

या माध्यमातून ७०० मीटरपेक्षा अधिक पाईपलाईन टाकण्यात येणार असून जवळपास ७० घरांचा पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमचा मार्गी लागणार आहे.

सन २०१६ मध्ये हद्दवाढ झाल्यानंतर शहरातील अनेक भागात पाईपलाईन टाकण्यात आली होती. मात्र खरप-पाचपिपळ परिसरातील काही भाग तांत्रिक कारणांमुळे विकासकामांपासून वंचित राहिला. येथील नागरिकांची घरे जिल्हा परिषद हद्दीत असून मतदान महानगरपालिकेत होत असल्याने प्रशासनिक अडचणी निर्माण होत होत्या. त्यामुळे महानगरपालिकेला थेट काम करणे किंवा पाणीपुरवठा देणे शक्य होत नव्हते. नगरसेवक निलेश देव यांनी सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा करत जिल्हा परिषद प्रशासन व महानगरपालिका प्रशासन यांच्यात समन्वय साधला आणि अखेर या कामासाठी मार्ग मोकळा झाला.

### नगरसेवक निलेश देव यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा

## रुग्णावर योग्य उपचार काळाची गरज - डॉ.अभिजीत पुंडकर

प्रतिनिधी १८ मे



**अकोट :** रुग्ण हा वेगवेगळ्या व्याधी घेऊन वैद्यकीय उपचारासाठी डॉक्टरांकडे येत असतात. प्रत्येक रुग्णाला उपचार मिळविण्यासाठी धडपड करावी लागते.परंतू प्रत्येक रुग्णांवर उपचार करणे काळाची गरज असल्याचे मत डॉ. अभिजीत पुंडकर यांनी व्यक्त केले.

स्व.सौ.सुनितातांई राजेंद्र पुंडकर स्मृती प्रित्यर्थ मातोश्री हॉस्पिटल ?न्ड क्रिटीकल केअर अकोट व संमेघ डेंटल केअर अकोट तर्फे मोफत भव्य रोगनिदान शिबीर रविवार ता.१७ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत श्री नेहरू विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय आकोलखेड येथे आयोजक अध्यक्ष व संचालक प्रागतिक शिक्षण प्रसारक मंडळ आकोलखेड यांनी आयोजन केले होते. शिबीरामध्ये ऱ्हदयरोग, अर्धांगवायू, मधुमेह, उच्च रक्तदाब, पोटाचे विकार, संधी वात, रक्तशय, दमा व फुफ्फुसांचे आजार, किडनीचे आजार, संपूर्ण दंत तपासणी, मुख कर्करोग निदान, लहान मुलांचे दंत उपचार आदींवर उपचार करण्यासाठी डॉ.अभिजीत पुंडकर, डॉ.प्रसन्न पुंडकर, डॉ. सौ. अश्विनी अभिजीत पुंडकर, डॉ. सौ. वैष्णवी पुंडकर, डॉ. सुरज तळोकार, डॉ.शुभम बानेरकर, डॉ.सुशिल तळोकार आदींनी सेवा दिली. सोबतच मोफत औषधोपचाराचे वाटप करण्यात आले. मोफत रोगनिदान शिबीरात ४०० गरजू रुग्णांवर उपचार करुन औषधोपचार केले.

## प्रल्हाद महाराज साखरखेर्डा यांच्या पादुकाचा शहरात पाद्यपूजेचा कार्यक्रम

प्रतिनिधी १८ मे



**अकोला :** अधिक मासानिमित्त प. पू. श्री. प्रल्हाद महाराज (रामदासी) साखरखेर्डा यांच्या पवित्र पावन चरण पादुकाचा पाद्यपूजेच्या कार्यक्रमाचे शहरातील विविध भागात दिनांक १७ मे २०२६ पासून सुरुवात झाली असून हा कार्यक्रम १ जून २०२०२६ पर्यंत शहरातील विविध भागात होणार आहे.

१७ मे रोजी स. ९.३० वा. श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान, जोगळेकर, प्लॉट येथे श्री. प्रल्हाद महाराज पादुकांचे ९.३० वा. आगमन झाले. भाविक भक्तांच्या वतीने महाराजांच्या पादुकांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.

२३ मे २०२६ पर्यंत जुने शहरातील उपासना मंडळाच्या नियोजनानुसार विविध भागातील भाविक भक्तांकडे पाद्यपूजेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान, जोगळेकर, प्लॉट येथे दररोज सकाळी काकडा आरती, संध्याकाळी सायं. उपासना, पंचपदी, शेजारती आदी कार्यक्रम होणार आहेत. २३ मे २०२६ रोजी संध्याकाळी आरोग्य नगर येथील प्रवीण देशपांडे यांच्याकडे उपासना, शेजारती तसेच २४ मे २०२६ रोजी सकाळी काकडा आरती होईल. त्यानंतर केशव नगरातील दत्त मंदिराजवळील आनंद नाईक यांच्याकडे सायं. उपासना. त्यानंतर गुरुकुल कमानजवळील गजानन लोणकर यांच्याकडे शेजारती व २५ मे २०२६ रोजी काकडा आरती होईल. त्यानंतर मिलिंद कुळकर्णी, केशव नगर यांच्याकडे सायं. उपासना होईल. गुरुकुल नगरीतील उमेश जोशी यांच्याकडे शेजारती व २६ मे २०२६ रोजी सकाळी काकडा आरती होईल. त्यानंतर राजे हॉटेलसमोरील श्रीकांत हातवळणे यांच्याकडे सायं उपासना होईल. जानोरकर मंगल कार्यालयासमोरील विश्वास मनभेकर यांच्याकडे शेजारती त्यानंतर २७ मे २०२६विश्वास मनभेकर यांच्याकडे काकडा आरती होईल. त्यानंतर वर्धमान नगरातील संदीप पत्की यांच्या सायं. उपासना होऊन निवारा नगर ५ मधील रितेश खोत यांच्याकडे शेजारती. २८ मे २०२६ रितेश खोत यांच्याकडे काकडा आरती, चंद्रशेखर भांडारकर, गड्डम प्लॉट यांच्याकडे सायं. उपासना व शेजारती, २९ मे २०२६ रोजी चंद्रशेखर भांडारकर गड्डम प्लॉट यांच्याकडे काकडा आरती, रामदासी मठ, मानेक टॉकीज मागे येथे सायं. उपासना होईल.

### निधन वार्ता

**रेखाताई भोपळे**



**हिवरखेड :** येथील श्रीमती रेखाताई सत्यव्रत भोपळे (९१) यांचे रविवारी निधन झाले. ताईबाई म्हणून त्या परिचित होत्या. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या अंत्यसंस्कार प्रसंगी समाजातील विविध क्षेत्रातील व्यक्ती उपस्थित होत्या.

**नारायणराव बंड**



**अडगाव :** . तळेगाव खुर्द येथील नारायणराव रामभाऊ बंड यांचे १३ रोजी निधन झाले. त्यांच्या मागे एक मुलगा, तीन मुली आणि आप्त परिवार आहे. त्यांच्या अंत्यसंस्कार प्रसंगी समाजातील विविध क्षेत्रातील व्यक्ती उपस्थित होत्या.

**अरविंद जोध**



**अकोला :** येथील योग शिक्षक तसेच अँग्लो उर्दू हायस्कूल मधील शिक्षक अरविंद त्र्यंबकराव जोध ( ५३ )यांचे १५ मे रोजी निधन झाले. अरविंद जोध शांत, संयमी व विद्यार्थ्यांप्रती समर्पित स्वभावामुळे आदराचे स्थान मिळवून होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा असा परिवार आहे. येथील रॅलीज इंडिया कंपनीत कार्यरत श्याम जोध यांचे ते लहान भाऊ होते.

## २८ मे रोजी ईद-उल-अजहा साजरी होणार

प्रतिनिधी १८ मे

**अकोला :** येथील कच्छी मस्जिद स्थित रिजवी नूरी दारुल इफ्ता यांच्या वतीने ईद-उल-अजहा (बकरी ईद) संदर्भात महत्त्वाची घोषणा करण्यात आली आहे. जारी करण्यात आलेल्या निवेदनानुसार, इस्लामी दिनदर्शिकेनुसार मंगळवार, १९ मे २०२६ रोजी १ जिलहिज्ज १४४७ हिजरी असेल. त्यानुसार १० जिलहिज्जच्या निमित्ताने ईद-उल-अजहा गुरुवार, २८ मे २०२६ रोजी साजरी करण्यात येणार आहे.

ईद-उल-अजहा हा मुस्लिम बांधवांचा अत्यंत महत्त्वाचा धार्मिक सण असून, तो कुर्बानीच्या ईद म्हणून साजरा केला जातो. या दिवशी मुस्लिम समाज नमाज-ए-ईद अदा करतो तसेच हजरत इब्राहिम अलैहिस्सलाम यांच्या सुन्नतीची आठवण ठेवत कुर्बानीचे पालन करतो. रिजवी नूरी दारुल इफ्ता यांच्या वतीने शहरातील नागरिक आणि मुस्लिम समाजाला आवाहन करण्यात आले आहे की, हा सण शांतता, बंधुभाव आणि साधेपणाने साजरा करावा. तसेच स्वच्छता आणि सामाजिक जबाबदाऱ्यांचे विशेष भान ठेवावे. ही घोषणा रिजवी नूरी दारुल इफ्ता, कच्छी मस्जिद ट्रस्ट यांच्या वतीने मुफ्ती मोहम्मद सादिक अख्तर रझवी मरकजी, खतीबो-इमाम कच्छी मस्जिद, अकोला यांनी जारी केली आहे.

## 'हर घर दुर्गा' अभियान अंतर्गत शिवकालीन युद्धकला प्रशिक्षण शिबीर प्रारंभ



प्रतिनिधी १८ मे

**अकोला :** डाबकी रोड रेणुका नगर येथील राजेश्वर कॉन्व्हेंट येथे हर घर दुर्गा अभियान अंतर्गत महिला व तरुणींसाठी शिवकालीन युद्धकला प्रशिक्षण शिबीर दिनांक १७ मे पासून प्रारंभ करण्यात आले.

हे अभियान प्रत्येक उन्हाळी सुट्टीमध्ये हर घर दुर्गा समिती तर्फे घेण्यात येते.

शिबीराचे उदघाटन डॉ. सौ.आरती गोडबोले यांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेचे व शस्त्र पूजन करून झाले यावेळी रेणुका नगर संघचालक विलास जोशी, राजेश्वर कॉन्व्हेंट अध्यक्ष नंदकिशोर मेहरे, गाडगेबाबा व्यायाम शाळेचे अध्यक्ष राजुभाऊ गोतमारे, हर घर दुर्गा महिला प्रशिक्षिका संगीता सरोदे तसेच हर घर दुर्गा समितीचे मार्गदर्शक राम भिरड यांच्या उपस्थितीत झाले.

मुख्य अतिथी डॉ आरती गोडबोले यांनी आजच्या काळात हर घर दुर्गा अभियानाची गरज व महत्व विशद करून प्रत्येक तरुणी तसेंच महिलांनी सुद्धा स्वसंरक्षणामध्ये सक्षम असले पाहिजे व ही काळाची गरज आहे हे सांगितले, तसेंच फक्त शस्त्र चालवता येणं हे पुरेसे नसून प्रत्येकीने आपल्यामध्ये हिंमत सुद्धा जोपसावी म्हणजे आपल्याला कोणी त्रास देण्यासाठी विचार करेल असे सांगितले. प्रत्येक तरुणी ही राणी झाशी प्रमाणे युद्धकलेत निपुण झाली पाहिजे हे दोन लहान गोष्टीमधून सांगितले. शिबीर यशस्वीतेसाठी समितीचे सूरज वाडेकर, उमेश तारापुरे, तुषार गोतमारे, पंकज मिरगे परिश्रम घेत आहेत. शिबीरात ८० च्या वर तरुणी आणि महिलांनी उस्फुर्त सहभाग नोंदविला आहे. हे शिबीर दिनांक २४ मे पर्यंत आहे.

## 'बाल सुसंस्कार शिबिर काळाची गरज': हभप विठ्ठल महाराज तेल्हारकार



प्रतिनिधी १८ मे

**हिवरखेड :** मुलांना योग्य वयामध्ये योग्य संस्कार मिळणे अत्यंत गरजेचे आहे. या उद्देशाने उन्हाळ्याच्या सुट्टीत बाल सुसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले. भाविकांनी या महायज्ञामध्ये तन मन धनाने सहकार्य करावे असे आवाहन शिबिराचे आयोजक ह.भ.प.विठ्ठल महाराज तेल्हारकर यांनी केले.

जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज सर्वांगीण विकास बाल सुसंस्कार शिबिराचे आयोजन येथील जि. प. प्राथमिक शाळेत २० मे २०२६ पर्यंत केले आहे. शिबिरात प्रामुख्याने देवभक्ती, देशभक्ती, धर्मभक्ती, मातृ-पितृभक्ती, शास्त्रशुध्द सुसंस्कार, कीर्तन, प्राणायाम, योगासने, प्रवचन, भजन, गायन , वादन , मृदंग, टाळ, श्रीमद् भगवद् गिता १५ वा अध्याय व निवडक श्लोक या विषयांचे धडे विद्यार्थ्यांना मिळत आहेत. शिबिराला प्रमुख उपस्थिती म्हणून रामायणाचार्य हभप संजय महाराज पाचपोर (गुप्तेश्वर संस्थान शिर्ला नेमाणे), हभप पुरुषोत्तम महाराज बावस्कार (जय श्रीराम आश्रम गाडेगाव खुर्द), भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज वाघ (ज्ञानेश आश्रम वारी भैरवगड), भोजने महाराज भक्त परिवार (श्री क्षेत्र अटाळी) लाभले.

# मुर्तिजापूरात मजुराला चौघांकडून बेदम मारहाण

प्रतिनिधी १८ मे

**मुर्तिजापूर :** शहरातील पटेल प्लाझा परिसरात असलेल्या १०१ बारच्या मागील बाजूस एका २१ वर्षीय तरुणाला चौघांनी संगनमत करून प्लास्टिक पाईप आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी मुर्तिजापुर शहर पोलिसांनी चार आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) च्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी हर्षल दिनेश ठोकळे वय २१, रा. जामठी खुर्द हा तरुण मजुरीचे काम करतो. दि. १४ मे २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजेच्या सुमारास तो पटेल प्लाझा परिसरात असताना, आरोपी पवन बोळे, सूरज उंबरकर, बिट्टू उंबरकर तिन्ही रा. हातगाव आणि टिनू गावंडे रा. सोनाळा यांनी संगनमत करून त्याला गाठले. जुन्या वादातून किंवा किरकोळ कारणावरून आरोपींनी हर्षलला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

### जीवे मारण्याची धमकी



ङपाईपने मारहाण व धमकीङ

हा वाद इतका विकोपाला गेला की, आरोपी पवन बोळे आणि सूरज उंबरकर यांनी हर्षलला प्लास्टिक पाईपने मारहाण करण्यास सुरुवात केली. तर आरोपी बिट्टू उंबरकर व टिनू गावंडे यांनी त्याला लाथाबुक्क्यांनी तुडवले. मारहाण केल्यानंतर आरोपींनी हर्षलला जीवे मारण्याची धमकी देऊन तेथून पळ काढला.

### पोलिसात धाव आणि गुन्हा दाखल

जखमी अवस्थेत हर्षलने मुर्तिजापुर शहर पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली. पोलिसांनी फिर्यादीचा जबानी रिपोर्ट आणि मेडिकल सर्टिफिकेटच्या आधारे आरोपींविरुद्ध कलम ११८(१), ११५(२), ३५१(३), ३५२ आणि ३(५) बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली ङपोलीस उपनिरीक्षक आशिष शिंदे करीत आहेत. या प्रकरणातील दाखल अधिकारी म्हणून पोलीस हवालदार मातकर ब.नं. २७० यांनी कामकाज पाहिले. भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली होती.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

सोमवार, दि. १८ मे २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


# सात घरफोड्यांचे गुन्हे उघड, 2.25 लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १८ मे



**यवतमाळ :** यवतमाळ शहरासह जिल्ह्यातील सात घरफोडीच्या गुन्ह्यांचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश करत दोन आरोपी व एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले. या कारवाईत चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी तब्बल २ लाख २५ हजार ९६० रुपयांचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.

यवतमाळ शहरातील वाढत्या संपत्तीविषयक गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक कुमार चिंथा यांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपासाचे आदेश दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने तपास सुरू केला. १६ मे २०२६ रोजी पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी सुरेश उर्फ जादू नरेंद्र मलांडे (वय २४, रा. पारवा, ह.मु. आठवडी बाजार, यवतमाळ), राहुल उर्फ मच्छी वामन वागदरे (वय २५, रा. तलाव फैल, यवतमाळ) तसेच एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला वेगवेगळ्या ठिकाणांहून ताब्यात घेतले. कौशल्यपूर्ण चौकशीत आरोपींनी यवतमाळ शहर, अवधूतवाडी, यवतमाळ ग्रामीण, बाभूळगाव आणि नेर पोलीस ठाण्यांत दाखल असलेल्या सहा घरफोडीच्या गुन्ह्यांची कबुली दिली. आरोपींकडून सोने-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख ७४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तसेच विधीसंघर्षग्रस्त बालकाने यवतमाळ शहर पोलीस ठाण्यातील आणखी एका घरफोडीच्या गुन्ह्याची कबुली दिली असून त्याच्याकडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ५१ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एकूण सात घरफोडीच्या गुन्ह्यांतील २ लाख २५ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून आरोपींना पुढील कारवाईसाठी यवतमाळ शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंथा, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मनीष गावंडे, पोउपनि गजानन राजमल्लू, पोउपनि शिवशंकर कायंदे तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# गोडाऊन चोरीप्रकरणी तीन सराईत आरोपी जेरबंद

प्रतिनिधी १८ मे

**यवतमाळ :** यवतमाळ शहर पोलिसांच्या डी.बी. पथकाने नाकाबंदी व पेट्रोलिंगदरम्यान धामणगाव रोडवरील गोडाऊन चोरीप्रकरणी तीन सराईत आरोपींना अटक केली. आरोपींकडून सुमारे ४ लाख ८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ मे २०२६ रोजी रात्री डी.बी. पथक नाकाबंदी व पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की, धामणगाव रोडवरील बजाज कंपनीच्या गोडाऊनमधून सोलर प्रकल्पासाठी लागणारे महागडे वायर बंडल चोरी करून काही जण नेत आहेत. माहितीच्या आधारे पोलिसांनी घटनास्थळी सापळा रचला.



पोलिसांची चाहूल लागताच आरोपींनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी पाठलाग करून धामणगाव रोडवर त्यांना ताब्यात घेतले. आरोपींकडून 'ओरियंट सोलर' कंपनीचे १२ वायर बंडल जप्त करण्यात आले. प्रत्येक बंडलची किंमत २६ हजार ५५० रुपये असून एकूण किंमत ३ लाख १८ हजार ६०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच चोरीसाठी वापरण्यात आलेली हिरो होंडा स्प्लेंडर दुचाकी (एमएच २९ सीक्यू ३३७२) किंमत ९० हजार रुपये जप्त करण्यात आली.

या प्रकरणी अक्षय भास्कर सहारे (वय ३२), सचिन भिवाजी मेश्राम (वय ४५) आणि प्रदीप मधुकर नंदेश्वर (वय ३८, सर्व रा. तलावफैल, जवाई नगर, यवतमाळ) यांना अटक करण्यात आली आहे. फिर्यादी सतीश अशोक वडनलवार यांच्या तक्रारीवरून यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१(४) व ३०५(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंथा, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने आणि पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथकाचे पोलीस उपनिरीक्षक गणेश सपकाळ, रावसाहेब शेंडे, पो.शि. गौरव ठाकरे, पो.शि. पवन नांदेकर, पो.शि. प्रदिप कुरडकर, पो.शि. पवन तडसे, पो.शि. मयुर तेल्लेवार यांनी केली.

# विद्युत वितरण कंपनीचा भोंगळ कारभार उघड

## वाकलेले खांब, लोंबकळणाऱ्या तारांमुळे नागरिक भयभीत

प्रतिनिधी १८ मे

**दिग्रस :** महावितरण कंपनीच्या दिग्रस शहरातील विद्युत व्यवस्थेचा निष्काळजी आणि भोंगळ कारभार पुन्हा एकदा समोर आला आहे. शहरातील अनेक भागांमध्ये विद्युत खांब धोकादायकरीत्या वाकलेले असून, काही ठिकाणी विद्युत तारा थेट रस्त्यांवर आणि घरांच्या परिसरात लोंबकळताना दिसत आहेत. पावसाळा तोंडावर आल्याने या परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शहरातील विविध भागांत वर्षानुवर्षे जुने, गंजलेले आणि कमकुवत झालेले विद्युत खांब अद्याप बदलण्यात आलेले नाहीत. अनेक ठिकाणी गार्ड वायर तुटलेल्या अवस्थेत असून त्या केवळ तात्पुरते बांधून ठेवण्यात आल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. काही खांब इतके झुकलेले आहेत की, ते केव्हाही कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

■ "अपघात घडल्यानंतर हालचाल करण्यापेक्षा आधीच उपाययोजना करणे गरजेचे आहे," अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी दिली आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, महावितरण कंपनीकडून नियमित देखभाल व दुरुस्तीच्या कामांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे. तक्रारींना वेळेवर प्रतिसाद न मिळणे, अपुरे मनुष्यबळ आणि मेंटेनन्सचा अभाव यामुळे शहरातील वीज व्यवस्था दिवसेंदिवस अधिक धोकादायक होत चालली आहे.

विशेषतः शाळा परिसर, बाजारपेठ आणि दाट लोकवस्तीमध्ये खाली लटकणाऱ्या तारांमुळे लहान मुलांसह सर्व नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. पावसाळ्यात जोरदार वारे आणि पावसामुळे वाकलेले खांब कोसळणे किंवा तारा तुटून मोठा अपघात होण्याची शक्यता वाढली आहे.

नागरिकांनी महावितरण कंपनी व प्रशासनाकडे तातडीने शहरातील सर्व धोकादायक खांब आणि लोंबकळणाऱ्या तारांचे सर्वेक्षण करून दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. पावसाळ्यापूर्वी विशेष मोहीम राबवून संपूर्ण वीज व्यवस्था सुरक्षित करण्यात यावी, अशीही आग्रही मागणी करण्यात आली आहे.

# शेतमजूराची आत्महत्या

प्रतिनिधी १८ मे

**आर्णी :** तालुक्यातील साकुर गावातील ४२ वर्षीय शेतमजूर शैलेश आंबादास गेडाम यांनी रविवारी (१७ मे) दुपारी घरातील शौचालयात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली.



शैलेश सकाळी घरासमोरील झाडाखाली बाज विणण्याचे काम करत होते. दुपारच्या सुमारास घरातील इतर सदस्य दुपारचा आराम करत असताना त्यांनी शौचालयात दोरी बांधून आत्महत्या केली. घटना लक्षात आल्यावर घरात एकच आक्रोश उडाला. पोलीस पाटील किशोर रामकर यांनी तत्काळ आर्णी पोलिस स्टेशनला माहिती दिली. आर्णी पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आणि शवविच्छेदनासाठी आर्णी ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले. बातमी लिखाणापर्यंत आत्महत्येचे नेमके कारण समजू शकले नाही. पोलिस अधिक तपास करत आहेत.

# सत्ताधारी नगरसेवकांची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

## ऑफलाईन निविदांवर गंभीर आक्षेप : ई-टेंडर नियम डावलल्याचा आरोप; चौकशी करून प्रक्रिया रद्द करण्याची मागणी

प्रतिनिधी १८ मे

**उमरखेड :** नगरपरिषदेमधील विविध विकासकामांच्या निविदा प्रक्रियेवरून मोठा वाद निर्माण झाला असून, विशेष म्हणजे सत्ताधारी गटातीलच सभापती व नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेत गंभीर आक्षेप नोंदविले आहेत. सन 2025-26 व 2026-27 या आर्थिक वर्षांतील मटेरियल खरेदी, मजूर पुरवठा तसेच देखभाल-दुरुस्तीच्या कामांसाठी राबविण्यात आलेल्या ऑफलाईन निविदा प्रक्रियेत मोठा गैरप्रकार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नगर परिषद उमरखेडमार्फत विविध विभागांच्या लाखो रुपयांच्या कामांसाठी ऑफलाईन पद्धतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या. मात्र, महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा धोरणानुसार आणि वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार तीन लाख रुपयांवरील सर्व खरेदी व कामांसाठी ई-टेंडर प्रक्रिया बंधनकारक असताना प्रशासनाने नियम डावलल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.



ऑफलाईन प्रक्रियेमुळे पारदर्शकतेचा अभाव निर्माण झाला असून स्पर्धात्मक निविदांना मर्यादा आल्याचेही नगरसेवकांनी नमूद केले आहे. तसेच, निविदांचे लिफाफे सर्व निविदाकारांसमक्ष उघडणे आवश्यक असताना कोणतीही पूर्वसूचना न देता गुप्तपणे लिफाफे उघडण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. संगनमत करून मर्जीतील ठेकेदारांना अपारदर्शक पद्धतीने कामांचे वाटप केल्याचाही दावा करण्यात आला आहे.

### नगरपरिषदेत अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर

■ या प्रकरणामुळे नगरपरिषदेमधील अंतर्गत मतभेद उघडकीस आले असून, आगामी काळात जिल्हा प्रशासन या तक्रारीवर काय भूमिका घेते याकडे राजकीय वर्तुळासह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

या संपूर्ण प्रकरणात तात्काळ हस्तक्षेप करून ऑफलाईन निविदा प्रक्रिया रद्द करावी, तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय चौकशी समिती नेमून दोषींवर फौजदारी व प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पुढील सर्व कामांसाठी फेर ई-निविदा प्रक्रिया जिल्हा प्रशासनाच्या देखरेखीखाली राबविण्याचे आदेश द्यावेत, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

ही मागणी नगरसेविका नाजेरा परविन शेख अकिल, बांधकाम सभापती प्रकाश रायाजी शिकारे, बालकल्याण सभापती फरजाना बेगम सय्यद रहीम आणि नगरसेवक साजीदउल्ला सनाउल्ला जागीरदार यांनी केली आहे. विशेष म्हणजे सत्ताधारी गटातीलच पदाधिकाऱ्यांनी स्वतःच्या प्रशासनाविरोधात जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केल्याने उमरखेड नगरपरिषदेत मोठी खळबळ उडाली आहे.

# पावसाळापूर्व तयारीकडे न.प.चे दुर्लक्ष ; नागरिकांची तीव्र मागणी

प्रतिनिधी १८ मे

**दिग्रस :** पावसाळा जवळ येत असताना दिग्रस शहरातील नालेसफाई, गटारी स्वच्छता, रस्त्यावरील खड्डे बुजविणे व पाणी निचऱ्याच्या कामांकडे नगर परिषद प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांनी जोरदारपणे केली आहे.

शहरातील अनेक भागांत गटारी तुंबलेल्या अवस्थेत आहेत आणि काही नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा साचला आहे. यामुळे पावसाळ्यात पाणी साचण्याची आणि कमी उंचीच्या वस्त्यांमध्ये घरांमध्ये पाणी शिरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




मागील वर्षांमध्ये शहरातील काही भागांत पाणी साचण्याच्या घटना घडल्याने यंदा प्रशासनाने पूर्वतयारीवर अधिक भर द्यावा, असे नागरिकांचे म्हणणे आहे. नालेसफाईची कामे प्रभावीपणे आणि वेळेत पूर्ण करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

नागरिकांनी मुख्याधिकाऱ्यांकडे शहराची प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# कृषी महाविद्यालयात ओरिएंटेशन क्लासचा शुभारंभ

## छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त विशेष आयोजन; विद्यार्थ्यांना ग्रामीण कृषी अनुभवाचे धडे

प्रतिनिधी १८ मे

**पुसद :** कृषी महाविद्यालय, उमरखेड येथे छत्रपती संभाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून ग्रामीण कृषी कार्य अनुभव (RAWE) कार्यक्रमांतर्गत ओरिएंटेशन क्लासचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. आठ दिवस चालणाऱ्या या विशेष प्रशिक्षण वर्गामधून विद्यार्थ्यांना शेती, शेतकरी आणि ग्रामीण जीवनाशी प्रत्यक्ष अनुभवातून जोडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य सचिन चिंतले होते. यावेळी विद्यार्थ्यांना आगामी सत्राबाबत योगेश वाकोडे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची रूपरेषा व प्रास्ताविक अनिल इंगळे यांनी मांडले.



या प्रशिक्षण कार्यक्रमात विजय शिंदे, संतोष आंबोरे, पल्लवी घोटेकर, डॉ. सोळंके आणि किशोर आगे यांनी विद्यार्थ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील शेती व्यवस्थापन, आधुनिक कृषी तंत्रज्ञान, शेतकऱ्यांशी संवाद आणि प्रत्यक्ष शेतभेटींचे महत्त्व याविषयी तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुषार चव्हाण यांनी केले, तर आभार प्रदर्शन कृष्णा गायकवाड यांनी मानले. आजपासून सुरू झालेला हा ओरिएंटेशन क्लास पुढील आठ दिवस सुरू राहणार असून, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ग्रामीण कृषी जीवनाचा अनुभव देण्यात येणार आहे.

### विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण

■ RAWE कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणासोबतच ग्रामीण वास्तव समजून घेण्याची संधी मिळणार आहे. या प्रशिक्षणातून भविष्यातील कृषी तज्ज्ञ अधिक सक्षम होतील, असा विश्वास महाविद्यालय प्रशासनाने व्यक्त केला.

# बोरबन भागात घरफोडीचा प्रयत्न ; चोरट्यांच्या हाती लागल्या 'तुरी'

## उन्हाळी सुट्यांचा फायदा घेत कुलूपबंद घरांना लक्ष्य

प्रतिनिधी १८ मे

**उमरखेड :** शहरातील अत्यंत गजबजलेल्या आणि रहिवासी वर्दळीच्या बोरबन परिसरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडीचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली आहे. मात्र, घरात कोणताही मौल्यवान मुद्देमाल न सापडल्याने चोरट्यांना रिकाम्या हाताने परतावे लागले. या धाडसी प्रकारामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, बोरबन परिसरातील रहिवासी विकास वानखेडे यांच्या मालकीच्या घरात गणेश मुधळ आणि साळेकर हे दोन भाडेकरू शिक्षणाच्या निमित्ताने राहत होते.



दोघेही स्वतंत्र ब्लॉकमध्ये वास्तव्यास होते. सध्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या सुरू असल्याने ते आपल्या मूळ गावी गेले होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास दोन्ही ब्लॉकचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला.

घरात प्रवेश केल्यानंतर चोरट्यांनी संपूर्ण घराची उचकापाचक करत रोख रक्कम व मौल्यवान वस्तूंचा शोध घेतला. मात्र, विद्यार्थी राहत असल्याने घरात कोणतेही दागिने किंवा मोठी रोकड नसल्याने चोरट्यांच्या हाती काहीच लागले नाही. त्यामुळे चोरट्यांना अक्षरशः 'तुरी' मिळाल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. सुदैवाने या घटनेत कोणताही महत्त्वाचा मुद्देमाल चोरीला गेला नसल्याचे समोर आले आहे.

### फिंगर प्रिंट टीम पाचारण; पोलिसांकडून तपासाला वेग

■ घटनेची माहिती मिळताच उमरखेड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. चोरट्यांचा माग काढण्यासाठी आणि पुरावे गोळा करण्यासाठी फिंगर प्रिंट तज्ज्ञांच्या पथकाला पाचारण करण्यात आले आहे. ठशांच्या आधारे आरोपींचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू असून, उमरखेड पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

# कारखान्याकडून एफआरपी रक्कम शेतक-यांच्या खात्यात जमा

## डफडी बजाव आंदोलन स्थगीत

प्रतिनिधी १८ मे

**उमरखेड :** वसंत सहकारी साखर कारखाना (पोफाळी) व भैरवनाथ शुगर मिल लिमिटेड यांनी २०२५-२६ हंगामातील गाळप केलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकीत एफआरपी रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केल्याने शेतकऱ्यांच्या डफडी बजाव आंदोलन स्थगीत करण्यात आले आहे.

शेतकरी नेते चितांगराव कदम यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी १६ मे रोजी कारखान्याच्या मुख्य गेटवर डफडी बजाव निषेध आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. मात्र, आंदोलनाच्या एक दिवस अगोदर म्हणजे १५ मे रोजी कारखाना प्रशासनाने ३५ कोटी रुपयांची थकीत एफआरपी रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केल्याने आंदोलन मागे घेण्यात आले.

सन २०२५-२६ हंगामात उमरखेड, हदगाव, हिमायतनगर या भागातील शेतकऱ्यांचा ऊस या दोन्ही कारखान्यांकडे गाळपासाठी नेला होता. ३० एप्रिलपर्यंत एफआरपी रक्कम देण्याचे लेखी आश्वासन कारखान्याच्या जनरल मॅनेजर यांनी ३ एप्रिल रोजी जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांना आणि शेतकरी नेते चितांगराव कदम यांना उपविभागीय अधिकारी यांच्या स्थितीत दिले होते. मात्र, आश्वासनाची पूर्तता न झाल्याने



शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. ऐन लग्नसराईच्या काळात सातत्याने होणाऱ्या चालढकलमुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती.

शिवसेना जिल्हा सहसंपर्कप्रमुख चितांगराव कदम यांनी सांगितले की, "आंदोलनाचा इशारा देताच कारखाना प्रशासन खडबडून जागे झाले आणि थकीत रक्कम जमा केली. त्यामुळे नियोजित आंदोलन स्थगीत करण्यात आले आहे."

# हवामान तज्ञ पंजाबराव डख यांनी दिला बदलत्या हवामानात नियोजनबद्ध शेती करण्याचा मंत्र

प्रतिनिधी १८ मे

**आर्णी :** बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर आगामी पीक हंगामाचे नियोजन कसे करावे, योग्य पीक निवड, खत व्यवस्थापन आणि हवामान अंदाजाचा शेतीमध्ये प्रभावी वापर याविषयी हवामान तज्ञ व कृषी मार्गदर्शक पंजाबराव डख यांनी शेतकरी बांधवांना मोलाचे मार्गदर्शन केले.

श्री म. द. भारती विद्यालय, शिवनेरी चौक ग्राउंड येथे १७ मे २०२६ रोजी आयोजित कार्यक्रमात मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. यावेळी पंजाबराव डख यांनी बदलत्या वातावरणानुसार शेती पद्धतीत आवश्यक बदल करण्याचे आवाहन करत वैज्ञानिक दृष्टिकोनातून शेती व्यवस्थापनाचे महत्त्व स्पष्ट केले.




या कार्यक्रमात राजेश आडे (सेवानिवृत्त कामगार उपयुक्त, मुंबई), गजानन केणे महाराज तसेच इतर मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. उपस्थित शेतकरी बांधवांनी मार्गदर्शनाचा उत्स्फूर्त प्रतिसाद देत समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अंजली ड्रेसेसचे संचालक राजेश श्रीवास, संतोष श्रीवास आणि प्रल्हाद काका इंगळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास पत्रकार बंधू, व्यापारी वर्ग तसेच परिसरातील नागरिकांचीही लक्षणीय उपस्थिती होती.

# रस्ते अपघातग्रस्तांसाठी 'पीएम राहत' योजना

**दीड लाखांपर्यंत मोफत उपचार मिळणार**

**अमरावती:** रस्ते अपघातातील जखमींना तातडीने आणि वेळेवर उपचार मिळावेत यासाठी केंद्र सरकारने 'पीएम राहत' ही योजना सुरू केली आहे. जिल्ह्यामध्ये या योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू झाली असून, अपघातग्रस्तांना आता दीड लाख रुपयांपर्यंत मोफत कॅशलेस उपचार मिळणार आहेत. योजनेतून तात्काळ कॅशलेस उपचार केले जातील. यात अपघाताच्या तारखेपासून जास्तीत जास्त ७ दिवसांपर्यंत १.५ लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत दिले जातील. अपघातानंतरचा पहिला तास अत्यंत महत्त्वाचा असतो. या काळात पैशांअभावी उपचार थांबू नये, यासाठी ही योजना राबविण्यात आहे. या योजनेच्या लाभासाठी कोणत्याही प्रकारच्या कागदपत्रांची सक्ती करण्यात आलेली नाही. यातील उपचारासाठी होणारा खर्च 'मोटार वाहन अपघात निधी' मधून केला जाणार आहे.

# महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त सेंद्रीय शेतीचा उपक्रम- पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## ◆ कृषि निविष्ठा लिंकिंगवर कठोर कारवाई करणार

प्रतिनिधी १८ मे




**अमरावती:** रासायनिक शेतीकडून सेंद्रिय शेतीकडे शेतकऱ्यांना वळविण्यासाठी व्यापक मोहिम हाती घेण्यात येणार आहे. ही मोहिम महात्मा जोतिराव फुले यांच्या २००व्या जयंतीनिमित्त राबविण्यात येणार आहे. पहिल्या वर्षात सुमारे एक हजार हेक्टर सेंद्रिय शेतीखाली आणण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आली आहे. त्यामुळे जनमत तयार करण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांनी व्यापक जनजागृतीची मोहिम हाती घ्यावी, असे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

पालकमंत्री बावनकुळे यांच्या उपस्थितीत आज जिल्हास्तरीय खरीप हंगाम २०२६ ची नियोजन बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. यावेळी कै. वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे, खासदार बळवंत वानखेडे, अमर काळे, विभागीय आयुक्त नयना गुंडे, आमदार संजय खोडके, रवी राणा, केवलराम काळे, प्रताप अडसड, प्रविण तायडे, राजेश वानखेडे, उमेश यावलकर, गजानन लवटे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मनपा आयुक्त वर्षा लड्ढा, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, जिल्हा पोलिस अधीक्षक निकेतन कदम उपस्थित होते.

बावनकुळे यांनी, सेंद्रिय शेती ही काळाची गरज आहे. देशस्तरावर सेंद्रिय शेतीबाबत जनमत तयार करण्याची मोहिम हाती घेण्यात आली आहे. सुरवातीला उत्पादकता कमी होत असली तरी रासायनिक खतांचा खर्च कमी होत असल्याने आणि शेतमालाला चांगला भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे कृषि विभागाने कृषि सहायकापासून तालुका कृषि अधिकारी स्तरापर्यंत उद्दीष्ट देऊन जिल्ह्यात सेंद्रिय शेतीबाबत सकारात्मक वातावरण तयार करावे. सेंद्रिय शेतीमुळे शेतकऱ्यांची रासायनिक खतांवरील अवलंबितता कमी होण्यास मदत मिळणार आहे.

खरीप हंगामाच्या सुरवातीला शेतकऱ्यांकडून कृषि निविष्ठांमध्ये लिंकिंगच्या तक्रारी करण्यात येत आहे. त्यामुळे कंपनी किवा स्थानिक विक्रेत्यांच्या स्तरावर लिंकिंग होणार नाही, यासाठी कृषि विभागाने भरारी पथकामार्फत कारवाई करावी. आवश्यकता भासल्यास विक्रेता आणि कंपनीवर गुन्हे दाखल करण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत लिंकिंगचा शेतकऱ्यांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी. येत्या काळात दुकानात लिंकिंगचे साहित्य ठेवता येणार नाही. त्यामुळे लिंकिंगवर अंकुश ठेवण्यास मदत होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना आवश्यक खते उपलब्ध व्हावेत, यासाठी प्रयत्न करण्यात यावे. यासोबतच प्रतिबंधित बियाणे जिल्ह्यात विक्री होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज उपलब्ध व्हावे, यासाठी बँकांना ताकिद देण्यात यावी. खरीपासाठी १६५० कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात येणार आहे. प्रामुख्याने राष्ट्रीयकृत आणि खासगी बँकांनी कर्ज वाटप करावे यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. कृषि कर्जवाटप करण्यासाठी बँकांना कॅम्प लावण्यासाठी सूचना करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

अल निनोच्या प्रभावामुळे जलसाठे प्रभावित होणार असल्याने जिल्ह्यात प्रामुख्याने जलसंधारणाची कामे प्राधान्याने करण्यात येणार आहे. प्रामुख्याने जलसंधारण आणि जलसंपदा विभागावर पाणी साठविण्याची जबाबदारी राहणार असल्याने याचे नियोजन करण्यात यावे. नाले आणि तलावातून गाळ काढण्यासाठी पुढाकार घेवून पाणी साठविण्यासाठी नियोजन करण्यात यावे. त्यासोबतच रिचार्ज शाफ्टची कामे हाती घेण्यात यावे. यासाठी सीएसआरचा निधी उपलब्ध करून कामे करण्यात यावी. जिल्ह्यात पांदण रस्त्यांबाबत चांगले काम करण्यात येत आहे. जिल्हा नियोजन आणि मातोश्री योजना मिळून पांदण रस्त्यासाठी निधी मिळत आहे. यासर्व निधीचा चांगली उपयोग करण्यात यावा. या कामांना लोकप्रतिनिधींनी भेटी द्याव्यात. या रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची नोंदणी करावी. चारा उपलब्ध होण्यासाठी बचतगटांना महसूली जागा देऊन याठिकाणी चारा निर्मितीसाठी प्रयत्न करण्यात यावे, अशा सूचना पालिकमंत्री श्री. बावनकुळे यांनी दिले.



माजी महिला व बालकल्याण विकास मंत्री ॲडव्होकेट यशोमती ताई ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना पुष्पगुच्छ देऊन आर आर सी न्यूज नेटवर्क व सिटी न्यूज सुपरफास्टचे अमरावती जिल्हा प्रतिनिधी संदीप मानकर यांनी स्वागत केले. व आर आर सी परिवाराच्यावतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# अवधूत गांधी यांच्या भक्ती - शक्ती संगम कार्यक्रमातून शिवशौर्य गाथेचा जागर

## ◆ स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त हजारो शिव - शंभू भक्तांनी दिली मानवंदना

प्रतिनिधी १८ मे



**अमरावती:** स्वराज्याचे दुसरे छत्रपती, अपराजित योद्धा, स्वराज्य रक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा ३६९ वा जन्मोत्सवा निमित्य छत्रपती संभाजी महाराज स्मारक समिती व शोध प्रतिष्ठान अमरावतीच्या वतीने आयोजित मानवंदना कार्यक्रम व लोक गायक अवधूतजी गांधी यांच्या भक्ती शक्ती संगम सोहळ्याला अमरावतीकरांची हजारोंच्या संख्येने मोठी उपस्थिती होती. यावेळी समस्त शिव -शंभू प्रेमींनी स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांना मानवंदना अर्पण करून त्यांचा इतिहास , विचार , शौर्य , आदर्श व बलिदानाचे स्मरण केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य संजय खोडके साहेब तसेच प्रमुख अतिथी म्हणून अमरावती विधानसभा मतदार संघाच्या आमदार सौ.सुलभाताई संजय खोडके तसेच विशेष अतिथी श्री.अवधूतजी गांधी , तसेच शोध प्रतिष्ठान अमरावतीचे अध्यक्ष यश खोडके, स्मारक समितीचे अध्यक्ष संकेत महल्ले , सचिव आकाश हिवसे , निमंत्रक ऋतुराज राऊत तसेच मान्यवर उपस्थित होते.

यात्रसंगी आपले मनोगत व्यक्त करतांना आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी सांगितले कि , छत्रपती संभाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर संपूर्ण देशाचे गौरवशाली व्यक्तिमत्व आहेत. त्यांच्या अतुलनीय बलिदानामुळे स्वराज्य अधिक सक्षम झाले आणि त्यांच्या शौर्याने स्वराज्य रक्षणचा सर्वात मोठा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. संभाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही स्वराज्याची पताका उंचावत ठेवली. त्यांनी स्वराज्यासाठी दिलेले बलिदान इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांच्या शौर्यगाथा आजही तरुण पिढीला प्रेरणा देणाऱ्या आहेत. छत्रपती संभाजी महाराजांच्या इतिहासाचे जतन, विचारांचे आणि आदर्शांचे स्मरण करत समाजात एकता, धैर्य आणि राष्ट्रभक्तीची भावना दृढ करण्याचा सर्वांनी आजच्या प्रसंगी संकल्प करण्याचे आवाहन अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी केले. दरम्यान महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री लोकनेता अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दोन मिनिटे मौन बाळगून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मानवंदना कार्यक्रमा नंतर महाराष्ट्राला सुपरिचित असलेले प्रख्यात लोकगायक व कलावंत श्री.अवधूतजी गांधी यांनी आपल्या सुमधुर वाणीतून भक्ती संगीत व शिव-शंभू यांची ख्याती विशद करणाऱ्या संगीतमय कार्यक्रमाची रंगतदार प्रस्तुती दिली. ज्यामध्ये अवधूत गांधी यांनी संतवाणी , भक्तिगीते, अभंग, भारूड, गोंधळ, अशा लोकगायनाची प्रस्तुती देऊन संपूर्ण परिसर भक्तिमय करून सोडला. . या रंगतदार कार्यक्रमातून मराठामोठ्या संस्कृतीचे दर्शन व वारकरी सेवेचा वारसा जपत शिवकालीन घटना व प्रसंगांना उजाळा मिळाला. श्री. अवधूत गांधी यांनी सादर केलेले 'देह विठ्ठल..' तसेच 'पावनखिंड' चित्रपटातील 'युगात मांडली' तसेच 'शिवबा राजा' सारख्या वीर रसात्मक गाण्यांच्या सादरीकरणामुळे या कार्यक्रमात चांगलीच बहर आली. अवधूत गांधी यांच्या कार्यक्रमात तबला वर पांडुरंगजी पवार, हार्मोनियम वर अभय नालगे , पखवाज राजेंद्र महाराज बघे, संबळ वादन सोमनाथ तरटे , ढोलकी प्रतीक डोळस , ताल गायन साथ विजय सोनोने यांनी अप्रतिम साथसंगत दिली. ज्याला उपस्थित रसिक व प्रेक्षक वर्गाची भरभरून दाद मिळाली.

यावेळी त्याबरोबर या कार्यक्रमात जबरदस्त संबळ वादन , तबला व ढोलकीच्या जुगलबंदीने उपस्थितांमध्ये प्रचंड जोश संचारला होता. तसेच आकर्षक रोषणाई, प्रकाश व्यवस्था, सजावट, ढोल पथक, देखील कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन संदीप जुनघरे यांनी केले.

# खुनाच्या गुन्ह्यातील तिन आरोपी २ तासात ताब्यात

## ◆ खुनाचा गुन्हा उघड, अमरावती शहर गुन्हे शाखेची कारवाई

प्रतिनिधी १८ मे



**अमरावती:** खुनाच्या गुन्हयातील तिन आरोपीतांना २ तासात ताब्यात घेऊन खुनाचा गुन्हा उघड करण्यात आला. ही कारवाई अमरावती शहर गुन्हे शाखेने केली.

१७ मे रोजी नियंत्रण कक्ष येथे माहीती प्राप्त झाली कि पोलीस स्टेशन खोलापुरी गेट हददीमधील झेंडा चौक माळीपुरा परीसरात खुन झाल्याची माहीती प्राप्त झाल्याने गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवून सदर मृतकाबाबत माहीती घेतली असता मृतकाचे नाव तेजस श्रीकृष्ण बिलबिले रा. माळीपुरा अमरावती असे असल्याचे माहीती झाले.

गुन्हे शाखेचे अधिकारी व अमलदार यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवुन मृतकाची ओळख पटवुन खुनाचा गुन्हा उघडकीस आणुन गोपनीय बातमीदार तसेच तांत्रिक विश्लेषणा वरून माहीती प्राप्त करून तात्काळ तिन आरोपी यांना कुंड सर्जापुर, वडाळी तसेच मालटेकडी परीसर अशा वेगवेगळया परीसरातुन ताब्यात घेवुन विचारपुस केली असता जुन्या वादाच्या कारणावरून चाकुने छातीवर वार करून मृतक तेजस बिलबिले यास जीवानिशी ठार मारल्याचे तसेच जखमी कार्तिक दिगांबर बोरूडे रा. माळीपुरा याचेवर चाकुने वार करून जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले वरून नमुद आरोपीतांना पुढील कार्यवाहीकरीता पो स्टे खोलापुरी गेट यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आकाश राजु बेलसरे वय २७ वर्ष रा. माळीपुरा अमरावती, वैभव राजु बेलसरे वय २५ वर्ष रा. माळीपुरा अमरावती, राजु उत्तमराव बेलसरे वय ५८ वर्ष रा. माळीपुरा अमरावती असे आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (गुन्हे), रमेश धुमाळ, सपोआ (गुन्हे शाखा) शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि. मनिष वाकोडे, सपोनि. महेश इंगोले, सपोनि दशस्थ आडे, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार-सुनिल लासुरकर, फिरोज खान, सतिश देशमुख, दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, मनोज ठोसर, सचिन बहाळे, मंगेश परिमल, आस्तिक देशमुख, जहीर शेख, मंगेश लोखंडे, मिर्झा नईम बेग, नाझीम उद्दीन सैयद, संभाजी केंद्रे, नापोका विकास गुडधे, अतुल संभे, पोका विशाल वाकपांजर, सागर ठाकरे, रंजीत गावंडे, राजीक रायलीवाले, सुरज चव्हाण, निखील गेडाम, योगेश पवार, चेतन गुल्हाणे, चालक चेतन शर्मा, राहुल दुधे, संदीप खंडारे, सुयोग काळबांडे यांनी केली.

# अमरावती शहर जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे माजी पालकमंत्री यशोमतीताई ठाकूर यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

## ◆ 'गुळतुला' व गरजू महिलांना शिलाई मशीन वाटप

प्रतिनिधी १८ मे



**अमरावती :** जिल्ह्याच्या लोकप्रिय नेत्या तथा माजी पालकमंत्री यशोमतीताई ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आज, रविवार दिनांक १७ मे २०२६ रोजी अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या वतीने विविध सामाजिक व रचनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक गौरक्षण येथे सर्व काँग्रेस नेत्यांच्या, पदाधिकाऱ्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या अभूतपूर्व उपस्थितीत हा सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

या मुख्य कार्यक्रमात माजी पालकमंत्री यशोमतीताई ठाकूर यांची 'गुळतुला' करण्यात आली. वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपत कार्यक्रमात गरजू व वंचित महिलांना स्वावलंबी बनवण्याच्या उद्देशाने 'शिलाई मशीन'चे वाटप करण्यात आले. महिलांना रोजगार व आधार देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. या प्रसंगी उपस्थित नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी यशोमतीताईंना दीर्घायुष्य लाभो, अशा शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे नियोजन अमरावती शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष . बबलू शेखावत आणि मनपाचे विरोधी पक्षनेते तथा माजी महापौर . विलास इंगोले यांच्या नेतृत्वात करण्यात आले होते.

या सोहळ्याला प्रामुख्याने माजी खासदार अनंतरावजी गुढे,शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले,स्वीकृत नगरसेवक मिलिंद चिमोटे,अनिल अग्रवाल,प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार,महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे,संजय वाघ,विनोद मोदी, आनंद बाबू भामोरे, हरिभाऊ मोहोड,नगरसेवक प्रशांत महल्ले,नगरसेविका अनिता काळे, नगरसेविका लुबना तनवीर,नगरसेवक धीरज हिवसे,नगरसेविका राजश्री राजेंद्र जठाळे,नगरसेविका मालता गवई,नगरसेविका अर्चना आत्राम, नगरसेविका आस्मा फिरोज खान, नगरसेवक विक्की वानखडे, नगरसेवीका सुनीता मनोज भेले,नगरसेविका ललिता सुरेश रतावा, नगरसेवक संजय शिरभाते,नगरसेविका अफसर जहा सादिक शहा,नगरसेवक मोहम्मद रेहान मोहम्मद यासीन (बल्ला भाई), निलेश गुहे, नितीन काळे, अनिकेत ढेंगळे, वैभव देशमुख, आशिष यादव, संकेत साहू, अभिनंदन पेंढारी, पुरोषातम मुंदडा, दीपक हुंडीकर, किरण साऊरकर, अब्दुल रफीक पत्रकार, मैथिली पाटील, वंदना निरगुडे, शुभांगी वरघट, अविनाश पांडे, किरण चांदवडकर, कांचन खोडके, अक्षय नगराळे, विजय राठोड, रवी चावरे, प्रवीण नवरंगे, प्रदीप अरबट, बिलाल भाई, नौशाद भाई, जावेद साबीर, जुबेर भाई, प्रीतम ठाकूर, प्रभाकर वाळसे, गजानन राजगुरे, मुकेश छांगाणी, प्रा.अनिल देशमुख, सतीश गवई,सतीश इंगोले, गोपाल यादव,दिनेश खोडके, गुड्डू चौधरी, बबलू दोडके, संजय ढोले, दिनेश जाऊरकर, अजय दंदे, जितेश नाईक, प्रमोद इंगोले, श्याम खेरडे, डॉ. गुणवंत डहाणे, दीपक अग्रवाल, नंदा सोनोने, सुनंदा गौड, अरुणा मारोडकर, स्विटी अनासाने, भैय्यासाहेब निचळ, प्रकाश पाहुरकर, संजय बोबडे, विजय शिंदे, मंगेश ठाकरे, विजय वानखडे, गजानन जाधव, रफीक चिकुवाले, साजिद अली, हुसेन भाई, विजय अटळकर, काका जोशी, पिंटू मरोडकर, शरद पवार यांच्यासह काँग्रेस कमिटीचे विविध सेलचे अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगरसेवकांच्या निवासस्थानी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची सदिच्छा भेट



**दर्यापूर :** महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दर्यापूर दौऱ्यादरम्यान नगरसेवक रोशन कट्यारमल यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी रोशन कट्यारमल व त्यांच्या सहकाऱ्यांनी साहेबांचे उत्साहपूर्ण वातावरणात पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. भेटीदरम्यान दर्यापूर शहरातील विविध विकासकामे, नागरिकांच्या समस्या तसेच स्थानिक पातळीवरील प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

पालकमंत्री बावनकुळे यांच्या भेटीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रसंगी अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दर्यापूर दौऱ्यात विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग घेत असताना पालकमंत्री बावनकुळे यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. रोशन कट्यारमल यांच्या निवासस्थानी झालेल्या सदिच्छा भेटीची शहरात मोठ्या प्रमाणात चर्चा रंगली होती.

# शेतकऱ्यांना वीज कनेक्शन मिळण्यासाठी पालकमंत्र्यांना निवेदन

## ◆ वंचित बहुजन आघाडीचा पुढाकार

प्रतिनिधी १८ मे



**दर्यापूर :** शेतकऱ्याला वीज कनेक्शन मिळणे बाबत वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष संजय चौरपगार यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन दिले.

पुंडलिकराव गावंडे रा. माऊली धांडे यांना शेतातील विहिरीवर/शेतीपंपा साठी विद्युत जोडणी दिनांक १६/१२/२०२० रोजी मंजूर झाली असून दि.१९/०१/२०२१ रोजी १३८०३ रुपये भरणा केला आहे तरी २०२०ते २०२६ पर्यंत आज तागायत यांना शेतीपंपासाठी विज कनेक्शन दिले नाही त्यांनी उप कार्यकारी अभियंता दर्यापूर, जिल्हाधिकारी , महावितरण कार्यकारी अभियंता अचलपूर, त्यांच्याकडे सतत पाच वर्ष पाठपुरावा केला. शेवटी दिनांक २/५/२०२६ला वंचित बहुजन आघाडी जिल्हाध्यक्ष अमरावती संजय चौरपगार यांच्या कडे तक्रार दाखल केली. त्या अनुषंगाने दिनांक १५/५/२०२६ ला उप कार्यकारी अभियंता दर्यापूर यांना भेटलो असता, त्यांच्याकडून असे उत्तर आले की मी यांना वीज देऊ शकत नाही तर मी त्यांना लेखी उत्तर द्या असे सुचित केले.परंतु आतापर्यंत त्यांनी लेखी उत्तर दिले नाही म्हणून आपनस नम्र विनंती आहे की आपण या शेतकऱ्याला शेतामध्ये वीजपुरवठा देण्यासाठी संबंधित कार्यकारी उपअभियंता यांना सुचित करून पालकमंत्र्यांना निवेदन देण्यात आले.

६
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार दि १८ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## इंधन टंचाईचा ताप नागरिकांमध्ये संताप



# डिझेल- पेट्रोल पेटले, मारहाणीतून जीवावर उठले !

## *जिल्ह्यात पेट्रोल पंपावर रांगाच रांगा * सामान्य नागरिकांनी काय करावे सांगा * दोन गटात एकमेकांना कॅनने हाणामारी * व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

वाशीम शहरातील अकोला नाका परिसरात असलेल्या छाबडा पेट्रोल पंपावर डिझेलसाठी नंबर लावण्याच्या वादावरून तुंबळ हाणामारी झाल्याची घटना घडली. या घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून या घटनेमूळे परिसरात वाहन धारकांची धावपड उडाली होती.

वाशिम जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून डिझेल टंचाई कायम आहे. अनेक पेट्रोल पंपांवर डिझेल मिळत नसल्याने वाहन चालकांची मोठी गर्दी होत आहे. काल संध्याकाळच्या सुमारास वाशिम शहरातील आकोला नाका परिसरातील छाबडा पेट्रोल पंपावर नंबर लावण्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये वाद झाला. हा वाद वाढल्याने काही जणांमध्ये कॅनने हाणामारी झाली.त्यामुळे काही काळ या पेट्रोल पंपावर गोधळ




### इंधन मिळण्याची प्रक्रिया लांबली, शेतीतील कामे थांबली...

खरीप हंगाम तोंडावर आला असतांना राज्यासह जिल्ह्यातील इंधन टंचाईचा फटका सर्वाधिक शेतकऱ्यांना बसत आहे. दिवसभर रांगेत लागूनही पेट्रोल -डिझेल मिळत नसल्याने इंधन मिळण्याची प्रक्रिया लांबली असून शेतीतील कामे थांबली आहे. आता शेतीतील कामे ट्रॅक्टर व इतर आधुनिक सामुग्रीवर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांची शेतीतील कामे ठप्प झाली आहे. इंधन पुरवठा उपलब्ध होत नसल्याने व दिवसभर पेट्रोल पंपावर रांगेत उभे राहावे लागत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तारांबळ उडत आहे.




### पंपावर गर्दी तुंबड, उडत आहे झुंबड अनेक ठिकाणी वाद, पोलिसांचा हस्तक्षेप...

पेट्रोल -डिझेल मिळण्यासाठी पेट्रोल पंपावर तुंबड गर्दी झाली असून झुंबड उडत आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी वाद होत आहेत. काही ठिकाणी तर पोलिस बंदोबस्तात पेट्रोल -डिझेल चे वितरण होत आहेत. रांगा लागूनही इंधन मिळत नसल्याने वाद होत आहे. गर्दी तुंबड झाल्याने झुंबड उडत आहे.

### जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंप बंद

पेट्रोललियम कंपण्यांकडून पेट्रोल पंपांना पेट्रोल डिझेलचा पुरवठा न झाल्याने जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंप बंद अवस्थेत होत.त्यामुळे नागरिकांची एकच झुंबड उडाली.

निमार्ण झालं होतं. या घटनेचे व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. डिझेल टंचाईमुळे शेतकरी, वाहन चालक आणि ट्रान्सपोर्ट व्यावसायिक अडचणीत आले आहेत.जिल्ह्यात डिझेल, पेट्रोल मिळत नसल्याने अनेक ठिकाणी असे अनेक वाद घडत असून अशी परिस्थिती पुढे राहिल्यास हे वाद आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## थोडक्यात

### भाजप जिल्हाध्यक्ष चितलांगे यांची ना.गडकरीसोबत चर्चा



•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

भाजपाचे जिल्हाध्यक्ष पुरूषोत्तम चितलांगे यांनी नागपूर येथील जलसंवर्धन कार्यक्रमाला गेले असतांना केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या सोबत वाशीम जिल्ह्याच्या विविध समस्यांवर चर्चा केली. आकांक्षीत जिल्हा असतांनाही विविध विकास कामे करण्याची मागणी केली. जिल्ह्यात कृषी,औद्योगीक क्षेत्रात विविध बदल कसा करता येईल. मोठे उद्योग कसे आणता येतील. या संबंधी चर्चा करून जिल्ह्यात रोजगार निर्मितीसाठी पुढाकार घ्यावा अशी विनंती जिल्हाध्यक्ष पुरूषोत्तम चितलांगे यांनी केली.

### सौ.शिलताई परमेश्वर अंभोरे यांचे निधन



**वाशीम :** सत्यमेव जयंते फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते आयु. परमेश्वर अंभोरे यांच्या अर्धांगिनी सौ. शिलताई परमेश्वर अंभोरे यांचा आज दि. १८/५/२६ रोजी निधन झाले असून त्यांचा अंत्यविधीचा कार्यक्रम सकाळी १०:३० वाजता, मोक्ष धाम वाशीम येथे ठेवण्यात आला आहे. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे. तरी सर्व नातेवाईक. मित्र मंडळ, व स्वकीयांनी, यांना कळविण्यात यावे.

### माफियांची आयडीयाच भारी...

## आलिशान कारमधून गो तस्करी !

### वाशीममध्ये घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद...



•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

वाशीम मध्ये रस्त्यावर बसलेल्या गायींना इंजेक्शन देऊन बेशुद्ध केलं जात असून त्यानंतर त्यांना कारमध्ये कोंबून नेला जात असल्याचा प्रकार समोर आलं आहे. गाय तस्करीचे ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करून तपास केला जात आहे.

वाशीम शहरात आलिशान कारमधून गाई तस्करीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात रात्रीच्या सुमारास आलिशान कारमधून आलेल्या चोरट्यांनी एका गाईला गुंगीचे औषध देत बेशुद्ध केले.त्यानंतर दुसऱ्या गायला गाडीत टाकण्याचा प्रयत्न करत असताना अचानक त्या परिसरातील एक व्यक्ती घरातून बाहेर आल्याने गो तस्करांनी तिथून पळ काढला.

त्यामुळे दुसरी गाय ही चोरी होता होता वाचली. याप्रकरणी गो रक्षकांनी वाशिम शहर पोलिसात तक्रार देत गुन्हा दाखल करून वाचलेल्या जखमी गायी वर उपचार केले. हा सर्व गाई तस्करीचा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. परिसरातील सीसी टीव्हीच्या आधारे गाई तस्करांचा शोध पोलिसाकडुन घेतला जात आहे.

शहरात दिवसेंदिवस गाईं तस्करीच्या घटनेत वाढ होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात असून पोलीस प्रशासनाने तस्करांना तात्काळ जेरबंद करावे अशी मागणी केली जात आहे

### एस.पी.कोल्ड्रिंक्समधील...

## बदाम शेकमध्ये मुंगळ्यांचा मेळ; नागरिकांच्या जीवाशी खेळ !





•सिटी न्युज ब्युरो @ केनवड•

मालेगाव येथील पोलीस स्टेशन समोरील एस. पी. कोल्ड्रिंक्स येथे बदाम शेकमध्ये मुंगळे आढळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ करणारी ही घटना असून, स्वच्छतेचे नियम पाळले जातात का, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका ग्राहकाने एस. पी. कोल्ड्रिंक्स येथून बदाम शेक घेतला असता त्यामध्ये मुंगळे आढळल्याचे सांगण्यात येत आहे. थंड पेयाच्या नावाखाली ग्राहकांना अस्वच्छ पेय दिले



जात असल्याचा आरोप होत असून, या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.पोलीस स्टेशनसमोरच अशा प्रकारे अस्वच्छतेचा प्रकार घडत असल्याने संबंधित प्रशासनाचे लक्ष नेमके कुठे आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. दररोज अनेक नागरिक, प्रवासी, विद्यार्थी या परिसरातून ये-जा करत असतात. अशा ठिकाणी खाद्यपदार्थ व पेय विक्री करताना स्वच्छतेचे नियम काटेकोरपणे पाळणे आवश्यक असताना, बदाम शेकमध्ये मुंगळे आढळणे ही अत्यंत गंभीर बाब आहे.

अन्न व औषध प्रशासन तसेच संबंधित विभागाने या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन दुकानाची तपासणी करावी. दोषी आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर प्रशासनाने आता तरी कठोर पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# महसूल विभागात भ्रष्टाचार, खोट्या नोंदी अन् बनावट फेरफार !

## रिसोड तालुक्यात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार



•सिटी न्युज ब्युरो @ शेलुबाजार•

जिल्ह्यातील महसूल विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाले असल्याच्या धक्कादायक बाबी समोर येत आहेत. सातबाऱ्यावर खोट्या नोंदी, बनावट फेरफार, वारस नोंदीत मोठा घोळ करून खोटे लेख जोडणे आणि सर्वात खळबळजनक प्रकार म्हणजे जिवंत व्यक्ती मृत दाखवून त्या व्यक्तीचे नाव सातबारावरून हटवणे असे प्रकार उघडकीस येत आहेत. या गैरप्रकारात आजमितीस तरी रिसोड तालुका अग्रस्थानी असल्याचे बोलले जात आहे.

### कोण अडकणार चौकशीच्या फेऱ्यात.. ?

महसूल विभागतील घोटाळे आणि गैरप्रकारात शेलुखडसे येथील बनावट फेरफारमुळे वाचा फुटली असून केवळ रिसोड तालुक्यातीलच नव्हे; तर संपूर्ण जिल्ह्यात खूप मोठा भ्रष्टाचार झाला असल्याची चर्चा जिल्हाभर होत आहे. परिणामी खडबडून जागी झालेले सबंधित प्रशासन आता ?क्शन मोडवर येणार असल्याची माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर दिली आहे. त्या अनुषंगाने सखोल चौकशी सुरू झाली तर तत्कालीन तलाठी, मंडळअधिकारी आणि नायब तहसीलदार चौकशीच्या फेऱ्यात अडकणार आहेत. सदर गैरप्रकारणात जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्यावर निलंबनाची टांगती तलवार कायम राहील व जे दोषी असून सेवानिवृत्त झाले आहेत त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल होऊ शकतात असे कायदेतज्ञ बोलत आहेत. संशयास्पद फेरफार रद्द झाले तर जुनी सातबारा पुन्हा पूर्ववत होणार अशी माहिती सुद्धा समोर येत आहे.


बुधवार दि १३ मे २०२६

महसूल विभागात अनागोंदी, गैरप्रकारे घेतल्या फेरफार नोंदी...

नाही खंत, भ्रष्टाचाराचा अंत, मृत व्यक्ती जिवंत !

धक्कादायक गैरप्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची गरज

प्रशासनातील भ्रष्टाचार, सरकारच जबाबदार.

गुरूवार दि १४ मे २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम वाशीम Express

महसूल विभागतील गैरप्रकार, प्रमाणित केला बनावट फेरफार !

महसूल विभागात खळबळ उडवून देणारी माहिती समोर

महसूल विभाग

रिसोड तालुक्यातील शेलुखडसे गावात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याचे सर्वश्रुत आहेच. सदर गावातील नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा योजनेतील घोटाळा राज्यभर गाजला आहे. याची चौकशी झाली असली तरी दोषींवर कठोर कारवाई न झाल्याने आजमितीस भ्रष्ट अधिकारी व कर्मचारी ताठ मानेने वावरत आहेत. तोच प्रकार महसूल विभागाअंतर्गत झाल्याचे उघड होत आहे. येथील जूना सर्व्हे नंबर १५६/२ मधील १९ जून २००८ रोजी नोंदविण्यात आलेला एक फेरफार संपूर्णतः बनावट असल्याचे पुरावे समोर आले आहेत. परिणामी हे असले घाणेरडे गैरप्रकार तालुक्यात मोठ्या प्रमाणात झालेले आहेत. अशी जनमानसात चर्चा होत आहे. त्यात प्रामुख्याने काही वर्षापूर्वी मयत झालेल्या व्यक्तीच्या नावे खरेदीखत करून जमीन नावावर करणे, मूळ वारसांना डावलण्यासाठी खोटे हक्कसोड लेख व मृत्यू दाखले जोडून इतरांच्या नावे वारस नोंद करणे, मूळ जमीन मालकांना अंधारात ठेवून तसेच महसूल विभागाच्या जमीन धारणाबद्दल असलेले सर्व नियम धाब्यावर बसवून गैरप्रकारे खरेदीखत करून घेणे असे कित्येक प्रकार आता समोर येत आहेत. या सर्व गंभीर प्रकाराची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी आता जोर धरत आहे. विशेष धक्कादायक बाब म्हणजे काही तलाठी व मंडळअधिकाऱ्यांनी संगनमताने हे गैरप्रकार केल्याचे पुरावे हाती आले आहेत. एकाच दिवसात १५ ते २० फेरफार नोंदी आढळून येत आहे.

नियमानुसार वारस,वाटणीपत्र यांसाठी हरकत मागवणे, प्रत्यक्ष चौकशी करणे बंधनकारक असताना सर्व नियमांना मुठमाती देत कोणतीही प्रक्रिया न राबवता परस्पर बनावट फेरफार व खोटी नोंद घेतली असल्याचे शेलुखडसे गावात उजागर झाले आहे. हे असले गैरप्रकार महसूल विभागासाठी लज्जास्पद तर आहेतच शिवाय अनेक माताभगिनींच्या हक्कावर घाला घालणारे ठरत आहेत. या गंभीर बाबीकडे सबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने कारवाई करून अशा बोगस नोंदी आणि बनावट फेरफार रद्द करून पूर्वीची सातबारा जैसे थे करावी अशी मागणी करण्यात येत आहे. याबाबत सबंधित प्रशासनाने दखल न घेतल्यास काही सामाजिक संघटना वरिष्ठ स्तरावर तक्रार दाखल करण्याच्या तयारीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तर काही सामाजिक कार्यकर्ते उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे बोलले जात आहे.

## घनकचरा व्यवस्थापन नियमची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश !

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

ग्रामीण भागातील घनकचरा व्यवस्थापन करणे हे स्थानिक स्वराज्य संस्थांचे अनिवार्य कर्तव्य असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी (दि.१४) तातडीची बैठक घेऊन याबाबत संबंधिताना निर्देश दिले. याबाबत जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी संयुक्त पत्र काढुन तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींना घनकचरा व्यवस्थापन नियम-२०२६ ची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

ग्रामपंचायत स्तरावर खालील बाबी तात्काळ राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ग्रामीण भागातील सर्व मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या संस्था, हॉटेल्स, मंगल कार्यालये आदींची नोंदणी करून त्यांना एक्सटेंड बल्क वेस्ट जनरेटर (EBWGR) प्रमाणपत्र देणे. प्रत्येक ग्रामपंचायतीत घनकचरा व्यवस्थापनासाठी किमान एक पूर्णवेळ कर्मचारी उपलब्ध ठेवणे. वर्षानुवर्षे साचलेल्या जुन्या कचऱ्याची (लिगसी वेस्ट) शास्त्रोक्त विल्हेवाट लावणे व डम्पसाईट पुनरुज्जीवनाची कार्यवाही सुरू करणे. केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या घनकचरा व्यवस्थापन नियम-२०२६ नुसार कुटुंब स्तरावर कचऱ्याचे चार प्रकारात वर्गीकरण अनिवार्यपणे करणे. प्रत्येक गावात सेग्रीगेशन शेड उभारणे, नाडेप खत खड्डयाद्वारे ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती करणे. कचरा वाहतुकीसाठी झाकलेली घंटागाडी उपलब्ध ठेवणे. ऐंश-२०२६ नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत कठोर कारवाई प्रस्तावित करणे.

ग्राम पंचायत, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आश्रमशाळा आदी शासकीय संस्थांमध्ये कचरा व्यवस्थापनाची प्रभावी अंमलबजावणी करणे. ग्रामस्तरावर प्रभावी जनजागृती मोहिमा राबविणे. सर्व ग्रामपंचायतींनी दर १५ दिवसांनी प्रगती अहवाल सादर करणे. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने स्वच्छ पर्यावरण हा संविधानाच्या अनुच्छेद-२१ अंतर्गत नागरिकांचा मूलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट करत घनकचरा व्यवस्थापन (Solid Waste Management - SWM) हा पर्यावरण, सार्वजनिक आरोग्य व प्रशासनाशी संबंधित अत्यंत गंभीर विषय असल्याचे नमूद केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
सोमवार, दि. १८ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# काकीनाडा-हिसार, नागपुर ते मडगाव गाड्यांचा थांबा उद्घाटन सोहळा संपन्न

**मलकापुर:** काकीनाडा हिसार या सात राज्यातून जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाडीचा व नागपूर ते मडगाव या गाडीचा थांबा उद्घाटन सोहळा शनिवारी रात्री थाटात पार पडला.

या कार्यक्रमाचे उद्घाटक दिल्ली येथील गुरुद्वारा प्रमुख बाबा रवींद्र सिंह, ज्येष्ठ पत्रकार रमेश उमाळकर, उद्योजक प्रसन्ना देशपांडे, डॉ. योगेश पटणी, उल्हास संचेती, राजेंद्र ओझा, मिलिंद डवले, डॉ स्वप्निल चोपडे, प्रभाकर चौधरी, तालुका प्रवासी मंडळाचे अध्यक्ष पारसमल झाबक, शेखर धरणगावकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख अतिथींचा सत्कार व प्रास्ताविक जिल्हा प्रवासी सेवा संघाचे अध्यक्ष अँड महेंद्र कुमार बुरड यांनी केले. याप्रसंगी सर्व वक्त्यांनी रेल्वेचा विकास करण्याचे तथा अनेक थांबे मलकापूरला येतील अशा आशावाद व्यक्त केला. याप्रसंगी प्रवासी संघाचे समीर जटाळे. विनोद राजदेव, नगरसेवक विशाल मधवानी, किशोर बाहेती, आर आर चव्हाण, शरद मांडविया, ज्ञानदेव पाटील, डॉ विजय डागा, शेतकरी संघटनेचे दामोदर शर्मा, डॉ. पी पी अग्रवाल, शंकर पाटील आदी हजर होते.

# अनोखा मेळ ! वासुदेवाच्या सुरांनी दिली 'डिजिटल स्वगणनेची' साद

प्रतिनिधी १८ मे

## शिक्षक राजेश कोगदे यांचा अभिनव उपक्रम

**खामगाव:** संस्कृतीचा वसा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वारसा जेव्हा एकत्र येतो, तेव्हा जनजागृतीचा एक नवा इतिहास घडतो. असाच एक सुंदर आणि स्तुत्य संगम सध्या बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव आणि शेगाव तालुक्यात पाहायला मिळत आहे. पुरातन लोककला 'वासुदेव' आणि आधुनिक काळातील 'डिजिटल स्वगणना' (Self-Enumeration) यांची सुरेख सांगड घालत, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक राजेश कोगदे (गुरुजी) यांनी ग्रामीण भागात जनजागृतीची एक नवी पहाट आणली आहे.

जिल्हा महसूल प्रशासन आणि खामगाव येथील शाहू, फुले, आंबेडकर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हे अनोखे अभियान राबवले जात आहे.

अश्मयुगाकडून डिजिटल युगाकडे वाटचाल करताना आपल्या लोककला विसरून चालणार नाही, उलट त्याच लोककलांच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान लोकांपर्यंत सहज पोहोचवता येते, हेच या उपक्रमाने सिद्ध केले आहे.

प्रशासनाचा दूरदृष्टीकोन, सामाजिक संस्थेची साथ आणि एका ध्येयवेड्या शिक्षकाचे कल्पक प्रयत्न यामुळे हे अभियान सध्या संपूर्ण जिल्ह्यात कौतुकाचा आणि चर्चेचा विषय ठरले आहे. कोगदे गुरुजींच्या या अनोख्या 'ज्ञानदानाने' आणि जनजागृतीने लोककलेचा मान तर राखलाच, सोबतील देशाच्या डिजिटल प्रगतीलाही हातभार लावला आहे.



**संस्कृती आणि तंत्रज्ञानाची जुळली तार**

'दान पावलं...' अशी आळवणी करत घराघरांवर मायेची सावली धरणारा वासुदेव आता गावोगावी नागरिकांना डिजिटल साक्षरतेचा धडा देत आहे. राजेश कोगदे गुरुजींनी वासुदेवाची पारंपारिक वेशभूषा, डोक्यावर मोरपिसांची टोपी, हातात चिपळ्या आणि अभंग गायनातून गावोगावच्या चावडीवर आणि गल्लोगल्लीत पायधूळ झाडली आहे. त्यांच्या मुखातून निघणारे लोककलेचे सूर आता नागरिकांना स्वतःची माहिती स्वतः नोंदवण्यासाठी म्हणजेच 'स्वगणनेसाठी' प्रवृत्त करत आहेत.

**नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

ग्रामीण भागातील जनतेला तांत्रिक गोष्टी क्लिष्ट वाटू नयेत, यासाठी योजलेली ही 'वासुदेव पद्धत' थेट लोकांच्या मनाला भिडली आहे. पारंपरिक कलेच्या माध्यमातून मिळालेला हा आधुनिक संदेश अत्यंत प्रभावी ठरत असून, एरवी जनगणनेबाबत उदासीन असणारे नागरिक आता स्वतःहून पुढे येत 'स्वगणना' करत आहेत.

# चिखली: इंदिरानगरातील ९ किलो २५० ग्रॅम गांजा जप्त

प्रतिनिधी १८ मे



**चिखली:** बुलढाणा जिल्ह्यात सुरू असलेल्या अमली पदार्थविरोधी 'मिशन परिवर्तन' मोहिमेंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने शहरातील इंदिरानगर, गौरक्षणवाडी परिसरात मोठी कारवाई करत तब्बल ९ किलो २१५ ग्रॅम गांजा जप्त केला आहे. जप्त करण्यात आलेल्या गांजाची अंदाजे किंमत ४ लाख ६० हजार ७५० रुपये इतकी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात गांजा व इतर अमली पदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक व विक्री करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांनी स्वतंत्र पथके तयार करून कारवाईचे आदेश दिले होते.

१६ मे २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, चिखली पोलीस स्टेशन हद्दीतील इंदिरानगर, गौरक्षणवाडी परिसरातील एका घरात अवैधरित्या गांजाची साठवणूक करण्यात आली आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकून सय्यद समीर सय्यद सलीम (वय ३८, रा. इंदिरानगर, गौरक्षणवाडी, चिखली) याच्या घरातून गांजा जप्त केला. या प्रकरणी चिखली पोलीस आरोपीविरुद्ध एनडीपीएस अॅक्ट कलम ८ (क), ठाण्यात २० (ब) (ii) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास चिखली पोलीस करीत आहेत.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, श्रेणीक लोढा तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोनि. सुनील अंबुलकर, सपोनि. यशोदा कणसे, पोहेकॉ दीपक लेकुरवाळे, अनुपकुमार मेहेर, विजय वारुळे, पोना अरविंद बडगे, पोकॉ मंगेश सनगाळे, अमोल वनारे, सतीश नाटेकर, दीपक वायाळ तसेच चालक समाधान टेकाळे व रवि भिसे यांनी सहभाग घेतला.

# आदिशक्ती मुक्ताई मंदिरात पुरुषोत्तम मासाला प्रारंभ

प्रतिनिधी १८ मे

## भाविकांची दर्शनासाठी गर्दी



**खामगाव:** तालुक्यातील पाळा फाटा येथील आदिशक्ती मुक्ताई मंदिरात १७ मे २६ पासून अधिक मासानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांना भक्ती भावाने आरंभ करण्यात आला आहे अधिक मासातील पहिल्या दिवशी १७ मे रोजी सकाळपासूनच भाविक भक्तांची दर्शनासाठी गर्दी दिसून येत होती


चिखली येथील संजय केवट यांनी सपत्नीक मुक्ताई देवीच्या मूर्तीवर अभिषेक केला पहाटे चार वाजता शहनाईचे वादन करीत काकडा आरती व विष्णुसहस्त्रनाम पार पडले यामुळे मंदिर परिसरात तील वातावरण भक्तीमय झाले होते ह भ प शांताराम महाराज पाळेकर यांचे कीर्तन पार पडले शेगाव येथील श्रीमती लिलाबाई देवळे यांनी अधिकमासाच्या महात्म्याचे वाचन केले या मंदिरात १७ मे ते १२ जून २६ या कालावधीत दररोज पहाटे काकड आरती हरिपाठ विष्णुसहस्त्रनाम अधिकमासाच्या महात्म्याचे वाचन व्याख्याने प्रवचने कीर्तने आधी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे या धार्मिक कार्यक्रमांचा व दर्शनाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री आदिशक्ती मुक्ताई मंदिराच्या विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# खामगावात दोन आत्महत्या

प्रतिनिधी १८ मे

**खामगाव:** येथील सतीफैल भागातील रहिवासी ६५ वर्षीय वृध्द इसमाने जनुना तलावात उडी घेवून आत्महत्या केली. तर श्रीधर नगर घाटपुरी येथील तरुणाने संत भय्युजी महाराज आश्रम जवळील परिसरात झाडाला गळफास घेवून जिवनयात्रा संपविली. या दोन्ही घटना १७ मे रोजी घडल्या.





याबाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार अमरजितसिंग बजरंगसिंग मेहरावय ५२ वर्षे रा. सतीफैल खामगाव यांनी शिवाजीनगर पोस्टेला फिर्याद दिली की, माझ्या घराशेजारी काका कृपालसिंह चरणसिंग मेहरा वय ६५ वर्षे रा. सतीफैल हे परिवारासह राहत होते व वॉचमन म्हणून काम करित काकूचा मृत्यू झाला तेव्हापासून काका मानसिक तणावात होते. तर १७ मे रोजी सकाळी ६.३० वाजता ते घरुन निघून गेले. बराच वेळ होवून काका घरी परत न आल्याने त्यांचा शोध घेत असतांना ते जनुना तलावाकडे गेल्याची माहिती मिळाली. ते तलावात गेल्याची शंका आल्याने गोताखोर यांचे माध्यमातून शोध घेतला असता सायंकाळी ४.४५ वाजता तलावातील पाण्यात बुडालेले दिसून आले. त्यांना खामगाव सामान्य रुग्णालयात नेले असता तेथील डॉक्टरांनी मृत घोषित केले. कृपालसिंग चरणसिंग मेहरा यांनी मानसिक तणावातून आत्महत्या केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या फिर्यादीवरुन पोलिसांनी कलम १९४ भानासुसं २०२३ अन्वये मर्ग दाखल केला आहे. तसेच दुसऱ्या घटनेत महादेव निवृत्ती ढोले वय २९ वर्ष रा. श्रीधर नगर घाटपुरी हा तरुण संत भय्युजी महाराज आश्रम जवळील पडीत जागेत एका झाडाला गळफास घेवून लटकलेल्या अवस्थेत आढळला. त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी स्थानिक सामान्य रुग्णालयात ठेवण्यात आला आहे.

# विहिरीत पडून तरुणाचा मृत्यू

प्रतिनिधी १८ मे

**जळगाव जामोद:** तालुक्यातील भेंडवळ बुद्रुक येथील शिवारात शेतात काम करत असताना, विहिरीतून पाणी काढताना अचानक तोल जाऊन विहिरीत पडल्याने एका २४ वर्षीय तरूणाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही धक्कादायक घटना शुक्रवारी १५ मे रोजी सकाळी घडली असून, संकेत निलेश ठाकरे (वय २४, रा. चावरा, ता. जळगाव जामोद) असे मृत पावलेल्या तरूणाचे नाव आहे. या घटनेमुळे चावरा परिसरात हळहळ व्यक्त होत असून गावावर शोककळा पसरली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, संकेत ठाकरे हा नेहमीप्रमाणे शुक्रवारी सकाळी आपल्या शेतात काम करण्यासाठी गेला होता. दरम्यान शेतात काम करत असताना विहिरीतून पाणी काढण्यासाठी तो गेला. मात्र, पाणी काढत असताना अचानक त्याचा पाय घसरला आणि जाऊन तो खोल विहिरीत पडला. विहिरीत पाणी जास्त असल्याने त्याचा पाण्यात बुडून जागीच मृत्यू झाला.

संकेत बराच वेळ घरी न आल्याने आणि शेतात शोध घेतला असता ही दुर्घटना उघडकीस आली. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह विहिरीबाहेर काढला. ऐन उमेदीच्या काळात तरुण मुलाचा असा दुर्दैवी अंत झाल्याने ठाकरे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

या घटनेची माहिती जळगाव जामोद पोलीस स्टेशनला देण्यात आली असून पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी भागवत उंबरहंडे हे घटनास्थळी दाखल झाले या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# रेती तस्करांवर कारवाई: सहा बोटींसह ८१ लाखांचा मुद्देमाल जप्त !

## एकाला अटक, इतर फरार, पोलिस, महसूलची कारवाई

प्रतिनिधी १८ मे

**देऊळगाव राजा:** तालुक्यातील ग्राम सिनगाव जहागीर शिवारातील संत चोखामेळा धरण परिसरात बोटींद्वारे सुरू असलेल्या रेतीच्या अवैध उपशावर देऊळगाव राजा पोलिसांनी महसूल विभागाच्या मदतीने धडक कारवाई करत तीन मोठ्या लोखंडी बोटी, ३ इंजिनयुक्त लहान बोटी, जोडणी साहित्य व ९ ब्रास रेती असा एकूण ८१ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आरोपी शेख फिटू शेख मुस्ताक व इतर फरार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ मे रोजी सकाळी पोलिस निरीक्षक ब्रह्मा गिरी यांना गुप्त माहितीदारामार्फत संत चोखामेळा धरण परिसरात बोटींच्या साहाय्याने शासनाचा महसूल बुडवून रेतीचा अवैध उपसा सुरू असल्याची माहिती मिळाली. गिरींसह पोलिस उपनिरीक्षक राजकुमार मोहोळकर, पो.हे.कॉ. रामकिसन गिते, पोलिस कर्मचारी प्रवीण डोईफोडे व शिवाजी दराडे तसेच महसूल विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी रवाना झाले. संत चोखामेळा धरण परिसरात पोलिसांची चाहूल लागताच काही संशयित लोक दुसऱ्या बोटीतून पसार झाल्याचे सांगण्यात आले. घटनास्थळावरून शेख फिटू शेख मुस्ताक (वय ३०, रा. अनामत, ता. राजमहल, जि. साहेबगंज, झारखंड) याला ताब्यात घेण्यात आले.

# नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी

## ◆ महाराष्ट्र नवनिर्माण सेनातर्फे नगर परिषद प्रशासनाला निवेदन

प्रतिनिधी १८ मे

**शेगाव:** शहरातील भीमनगर परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून पाणीपुरवठ्याची गंभीर समस्या निर्माण झाली असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. बळीराम गुरुजी ते गोवर्धन शेगोकार यांच्या घरापर्यंतच्या भागात नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना तर्फे नगर परिषद प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

मनसे पदाधिकाऱ्यांनी मा. मुख्याधिकारी, नगर परिषद शेगाव यांची भेट घेऊन संबंधित भागातील पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत करण्याची मागणी केली. यावेळी प्रशासनाकडून लवकरच प्रश्न सोडविण्याचे आश्वासन देण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

निवेदनादरम्यान यापूर्वी भोईपुरा परिसरातील खराब रस्त्याबाबत देण्यात आलेल्या निवेदनाचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. येणाऱ्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संबंधित रस्त्यावर तातडीने मुरूम टाकून रस्ता दुरुस्त करण्यात येईल, अशी हमी मुख्याधिकाऱ्यांनी दिली.

हे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेना जिल्हाध्यक्ष अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष नितीश भावरकर, माजी शहराध्यक्ष राहुल धनोकार, सचिन नागे, समाधान शेगोकार, धनंजय लोखंडे, ज्ञानेश्वर नंदाने यांच्यासह अनेक मनसे कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच या अभियानासाठी शहराध्यक्ष परमेश्वर लाहूडकर, शहर उपाध्यक्ष विनोद फुंडकर, सोपान बघेवार आणि योगेश खांडेकर यांनी विशेष सहकार्य केले.

# डॉ. व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालयात एआयसीटीई पुरस्कृत पाच दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

प्रतिनिधी १८ मे

## मानवी मूल्यांच्या संवर्धनावर होणार मंथन

**मलकापूर:** वर्तमानातील धावपळीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात मानवी मूल्यांची जपणूक करणे ही काळाची गरज बनली आहे. याच उदात्त हेतूला समोर ठेवून, स्थानिक लोक सेवा शिक्षण बहुउद्देशीय मंडळ संचालित, पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, मलकापूर येथे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद पुरस्कृत 'युनिव्हर्सल ह्युमन व्हॅल्यूज - छ' या विषयावर पाच दिवसीय भव्य फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २३ मे ते २७ मे २०२६ या कालावधीत ही कार्यशाळा महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडणार असून, 'एक सुसंवादी, नैतिक आणि मूल्यधिष्ठित समाजाची निर्मिती' हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्राध्यापकांमध्ये नैतिक दृष्टिकोन, सर्वांगीण विकास आणि व्यावसायिक सचोटी निर्माण करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

आजच्या शिक्षण पद्धतीत केवळ पुस्तकी ज्ञान किंवा तांत्रिक कौशल्ये पुरेशी नसून, विद्यार्थ्यांसमोर आदर्श ठेवण्यासाठी स्वतः शिक्षकांमध्ये मानवी मूल्यांची रुजवणूक होणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून या पाच दिवसीय कार्यशाळेची आखणी करण्यात आली आहे. या कार्यक्रमादरम्यान तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून परस्पर संबंधांमधील विश्वास, आदर, स्नेह आणि कृतज्ञता यांसारख्या मानवी मूल्यांवर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे. विशेषतः अभियांत्रिकी सारख्या तांत्रिक क्षेत्रात काम करताना सामाजिक जबाबदारी आणि नैतिकतेचे भान कसे राखावे, यावर या कार्यशाळेत विशेष भर दिला जाणार आहे. महाविद्यालयाने या उपक्रमाद्वारे केवळ शैक्षणिकच नव्हे तर सामाजिक परिवर्तनासाठी एक सकारात्मक पाऊल उचलले आहे.

या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमासाठी विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे व्यवस्थापन आणि प्राचार्य डॉ अनिल खर्चे, प्रशासकीय डीन डॉ. युगेश खर्चे, आयक्युएसी अधिकारी प्रा. रमाकांत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वय समिती कार्यरत आहे. नोंदणी प्रक्रियेसाठी महाविद्यालयाने डिजिटल माध्यमांचा वापर केला आहे. कार्यक्रमाच्या नोंदणीसाठी तसेच अधिक माहितीसाठी समन्वयक प्रा. पी. बी. भिसे (मो. ७७२००८०३५४) आणि प्रा. ख्याती चौधरी (मो. ८२६१०८४३३१) यांच्याशी संपर्क साधवा असे आवाहन कॉलेज प्रशासनाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. मलकापूर सारख्या शैक्षणिक केंद्रात अशा प्रकारच्या उच्च दर्जाच्या कार्यशाळेचे आयोजन केल्याबद्दल शिक्षण क्षेत्रातून महाविद्यालयाचे कौतुक होत आहे. या उपक्रमामुळे प्राध्यापकांना आपल्या अध्यापन शैलीत आणि वैयक्तिक आयुष्यात मूल्यांची अंमलबजावणी करण्यास मोठी मदत होणार आहे.

# ड्रोन उडवण्याचे प्रशिक्षण मोफत; अधिकृत परवाना घेऊन सुरू करा व्यवसाय

प्रतिनिधी १८ मे

## खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बलांसाठी शासनाच्या अमृत संस्थेची योजना

**बुलढाणा :** शेतीपासून फोटोग्राफी, भूमापन, पीक सर्वेक्षण ते सरकारी प्रकल्पांच्या निरीक्षणापर्यंत विविध क्षेत्रांत ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर झपाट्याने वाढत आहे. या आधुनिक तंत्रज्ञानामध्ये करिअर घडवण्याची सुवर्णसंधी आता राज्य शासनाच्या 'अमृत ड्रोन मिशन' अंतर्गत उपलब्ध झाली असून, पात्र युवकांना मोफत निवासी ड्रोन पायलट प्रशिक्षण दिले जात आहे. विशेष म्हणजे, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर अधिकृत ड्रोन ऑपरेटर परवानाही दिला जातो.

महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या रूपाने कार्यरत असलेली महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवकांना स्वयंरोजगार व उद्योजकतेसाठी विविध कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबवते. त्याचाच भाग म्हणून 'अमृत ड्रोन मिशन' ही योजना सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत दिला जाणारा १० दिवसांचा निवासी प्रशिक्षण कोर्स अत्यंत दर्जेदार असून, सामान्यतः यासाठीलाखो रुपये खर्च करावे लागतात. मात्र लक्षित घटकांतील युवकांना हे प्रशिक्षण पूर्णतः मोफत दिले जाते. प्रशिक्षण कालावधीत राहण्याची व जेवणाची व्यवस्थाही संस्थेकडूनच केली जाते. या प्रशिक्षणामध्ये शेती फवारणी, पीक सर्वेक्षण, भूमापन, एरियल फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी, आपत्ती व्यवस्थापन, ड्रोन हाताळणी, देखभाल व 'डीजीसीए'च्या सुरक्षित उड्डाण नियमांचे सखोल मार्गदर्शन दिले जाते. प्रात्यक्षिक प्रशिक्षणावर विशेष भर असल्याने युवकांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळतो. आजपर्यंत शंभरहून अधिक लाभार्थ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला असून, अनेकांनी ड्रोन सेवांद्वारे उत्पन्नाचे साधन निर्माण केले आहे. अमृत संस्थेच्या प्रशिक्षणाच्या गुणवत्तेची दखल घेत गोवा आपल्या शासनानेही अधिकाऱ्यांना याच संस्थेमार्फत प्रशिक्षण दिले आहे. अर्ज प्रक्रिया पूर्णत ऑनलाइन असून इच्छुकांनी अमृत संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करावा. अधिक माहितीसाठी जिग्नेश कमाणी जिल्हा व्यवस्थापक, अमृत बुलढाणा तिसरा मजला, बुलढाणा प्राइड बिल्डिंग, कार्यालयासमोर, बुलढाणा येथे संपर्क साधावा.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. १८ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# साडेसहा लाख लोकांसाठी शहरात नाही एकही सिटी बस !

## ◆ पंतप्रधानांच्या सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्याचे कसे करावे पालन?

प्रतिनिधी १८ मे

**अकोला :** पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धामुळे देशभरात इंधन टंचाई सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढविण्याचे आवाहन केले आहे. तर दुसरीकडे अकोला महापालिकेत भाजपाची सत्ता असताना व शहराची लोकसंख्या साडेसहा लाखापर्यंत गेली असल्यावरही नागरिकांना एकही सिटी बस उपलब्ध नसल्याने नागरिकांनी पंतप्रधानांच्या आवाहनाचे पालन कसे करावे हा मोठा प्रश्न नागरिकांसमोर उभा ठाकला आहे. मागील पंधरा वर्षापासून महापालिकेत भाजपाची सत्ता आहे तीस वर्षापासून भाजपाचे खासदार व आमदार आहेत त्या उपरही शहरवासीयांच्या नशिबी एकही सिटी बस नसल्याने या शहरात




बाहेरगावावरून येणारे नागरिक आश्चर्य व्यक्त करीत आहेत. शहराची हद्द वाढ झाली आहे त्यामुळे हद्द वाढ झालेल्या भागातील नागरिकांना सुद्धा शहरात येण्यासाठी ऑटो रिक्षाचा उपयोग करावा लागत आहे.

त्यातही रिक्षाचालक इंधनाचे भाव वाढल्याची सबब पुढे करीत मनमानी पद्धतीने भाडे आकारत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

**शहरात सिटी बस साठी केंद्राचे निकष काय?**

केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालय तसेच विविध शहरी वाहतूक अभ्यासानुसार प्रति एक लाख लोकसंख्येसाठी किमान ४० बसेस असणे गरजेचे आहे. तर चांगली बस सेवा घेण्यासाठी प्रति एक लाख लोकसंख्येमागे ६० बस असणे आवश्यक आहे परंतु शहराची लोकसंख्या साडेसहा लाख पर्यंत गेल्यावरही तसेच शहराची हद्द वाढ झाल्यानंतरही शहरवासीयांच्या नशिबी एकही बस नसल्याने लाडक्या पंतप्रधान मोदींच्या सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवण्याच्या आवाहनाचे पालन कसे करावे हा मोठा प्रश्न नागरिकांसमोर निर्माण झाला आहे.

### शहरातील सिटी बस सेवेचा उडाला फज्जा


नगरपालिका असताना शहरात खडकी ते रेल्वे स्टेशन तसेच उमरी ते डाबकी रोड पर्यंत नियमित बस सेवा सुरू होती. कालांतराने ती बंद पडली. परंतु त्यानंतर महापालिका झाल्यानंतर दोन वेळा मिनी बस सेवा शहरात सुरू करण्यात आली होती. परंतु नियोजना अभावी या दोन्ही बस सेवा बंद झाल्या आहेत. या सर्व बसेस धुळखात नेहरू पार्क परिसरातील पाण्याच्या टाकी परिसरात भंगार बनत चालल्या आहेत. यावर्षी महापालिका निवडणुकीच्या घोषणापत्रात भाजपाने शहरात सिटी बस सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे. त्या आश्वासनाची पूर्ती केव्हा होते व शहरातील नागरिकांना पंतप्रधानाच्या आवाहनाचे पालन करण्याची संधी शहरातील सत्ताधारी भाजपा नेते केव्हा देतात याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

# अधिक मासानिमित्त स्वर्ण पेढ्यांमध्ये 'जुने द्या नवीन घ्या' चा फार्मूला जोरात

## ◆ ग्राहकांनी खरेदी थांबवू नये म्हणून आकर्षक योजना सुरू

प्रतिनिधी १८ मे

**अकोला :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना सोने खरेदी न करण्याचे केलेले आवाहन तसेच सोन्या चांदीच्या दरांमध्ये झालेल्या वाढीनंतर अकोला शहराच्या सराफा बाजारात ग्राहकांची खरेदी काही प्रमाणात थांबली असली तरी सराफा व्यापाऱ्यांनी बाजारात नव्या योजना आणि सकारात्मक उपक्रम सुरू केले आहेत. ग्राहकांनी सोने खरेदी थांबवू नये तसेच व्यवहार सुरळीतपणे सुरू राहावे म्हणून शहरातील काही सराफा पेढ्यांमध्ये आकर्षक योजना सुरू झाल्या आहेत. सोन्या चांदीच्या वाढलेल्या दरांच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांना पुन्हा आकर्षित करण्यासाठी सराफा व्यापाऱ्यांनी जुने दागिने द्या व नवे दागिने घेऊन जा ही आकर्षक योजना मोठ्या प्रमाणावर राबविण्यास सुरुवात केली आहे. या योजनेमुळे ग्राहकांना त्यांच्या जुन्या दागिन्यांचा योग्य मोबदला मिळत असून कमी खर्चात नवीन डिझाईन मध्ये दागिन्यांची संधी उपलब्ध झाली आहे. या १७ मे ते १५ जून दरम्यान च्या अधिक मासा साठी सराफा दुकानात विशेष



ऑफर्स दिल्या जात आहेत. लग्नसराईचा हंगाम अंतिम टप्प्यात असताना आणि दरांमध्ये चढ-उतार सुरू असतानाही या नव्या योजनांमुळे बाजारात पुन्हा ग्राहकांची हालचाल वाढताना दिसत आहे. विशेषतः हॉलमार्क असलेल्या जुन्या दागिन्यांच्या बदल्यात वजनाला वजन किंवा कमी मेकिंग चार्ज मध्ये नवीन दागिने देण्याची संकल्पना ग्राहकांना अधिक सोयीची ठरत आहे. त्यामुळे रोख खरेदी पेक्षा एक्सचेंज व्यवहारांना मोठी मागणी दिसून येत आहे. दरम्यान १७ मे ते १५ जून दरम्यान येणाऱ्या अधिक मासाच्या काळात हॉलमार्क असलेल्या जुन्या दागिन्यांवर ग्राहकांचा विश्वास अधिक असल्याने अशा दागिन्यांच्या एक्सचेंज व्यवहारात वाढ झाली आहे. अनेक दुकानदारांनी वजनाला वजन आणि कमी मेकिंग चार्ज मध्ये नवीन दागिने देण्याचे पर्याय उपलब्ध करून दिले आहेत त्यामुळे ग्राहकांना पारदर्शक व्यवहाराचा अनुभव मिळत असून मोठ्या खरेदी ऐवजी जुन्या दागिन्यांच्या एक्सचेंज ला प्राधान्य दिले जात आहे.

# पुरी-कामाख्या-बैद्यनाथ भारत गौरव पर्यटन रेल्वे यात्रा

प्रतिनिधी १८ मे

**अकोला :** भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळतर्फे भारत गौरव पर्यटक रेल्वेद्वारे आयोजित पुरी-कामाख्या-बैद्यनाथ धाम आध्यात्मिक यात्रा भाविकांसाठी एक पवित्र व अविस्मरणीय अनुभव ठरणार आहे. ११ रात्री व १२ दिवसांची यात्रा २५ जून २०२६ रोजी पुणे येथून सुरू होणार असून, देशातील प्रमुख धार्मिक स्थळांचे दर्शन या यात्रेत घडविण्यात येणार आहे. अकोला, बडनेरा, भुसावळ, वर्धा, नागपूरसह अनेक स्थानकांवरून चढण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या यात्रेदरम्यान भाविकांना जगन्नाथ मंदिर (पुरी), कामाख्या मंदिर (गोहाटी), बद्रीनाथ मंदिर (जसीडीह), काशी विश्वनाथ मंदिर (वाराणसी) तसेच श्रीराम जन्मभूमी मंदिर (अयोध्या) या प्रसिद्ध तीर्थस्थळांचे दर्शन घेण्याची संधी मिळणार आहे. या सर्व सुविधा असलेल्या पॅकेजची सुरुवात २२ हजार ७७० रुपये प्रति व्यक्तीपासून होत आहे.

# गॅरेज समोर उभ्या असलेल्या वाहनांना आग

प्रतिनिधी १८ मे

**अकोला :** गॅरेजच्या समोर किंवा सर्व्हिस सेंटरमध्ये उभ्या असलेल्या वाहनांना लागणाऱ्या आगीच्या घटनांमध्ये वाढ होत असून, वाशिम बायपास रोड बुध्द नगरीच्या बाजुला समीर गॅरेज समोर विद्युत डिपी (रोहित्र) लगत उभ्या चारचाकी वाहनाला सकाळी ६:४५ च्या सुमारास भीषण आग लागली. सुरवातीला एका वाहनाला आग लागली पाहता पाहता त्याच वाहनाच्या बाजूला उभ्या असलेल्या वाहनाला व विद्युत डिपी (रोहित्राला) वरील विद्युत तारा पण आग लागली.




उभ्या असलेल्या आणखी वाहनाच्या काचा फोडून नागरिकांच्या मदतीने ढकलत बाजूला करण्यात आले.रस्त्यावर बघ्याची एकच गर्दी झाली होती सर्व नागरिक व्हिडिओ काढण्यात मग्न होते. सामाजिक कार्यकर्ते व जागृत नागरिक उमेश इंगळे यांनी क्षणाचाही विलंब न करता अग्निशामक विभाग प्रमुख मनिष कथले यांना व पोलीस विभाग ११२ वर फोन करून आगीच्या घटनेची माहिती दिली अग्निशामक विभागातिल फायरमॅन निखिल आपोतीकर, सचिन माहोरे, दिनेश वाघमारे वाहन चालक - धर्मकुमार वाकोडे यांनी तात्काळ घटनास्थळी पोहचत आग आटोक्यात आणली. सामाजिक कार्यकर्ते उमेश इंगळे यांच्या प्रसंगावधानामुळे मोठी घटना होण्यापासून टळली.

# शांततेचे प्रतीक झाले हिंसेचे कारण

## कबुतराच्या वादातून कुटुंबावर हल्ला

प्रतिनिधी १८ मे

**अकोला :** क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादाचे पर्यवसान एका कुटुंबावर हल्ल्यात झाले. खदान परिसरात घटना घडली. कबुतराच्या कारणावरून झालेल्या वादातून तिघांनी एका व्यक्तीवर कोयत्याने जीवघेणा हल्ला करत पत्नी व मुलालाही मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची गंभीर बाब समोर आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सलमा बी शेख अफसर (४०) रा. मदिना मशीदजवळ, झिराबावडी, खदान यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद केले की, त्यांचे पती शेख अफसर शेख अफजल व दोन मुलांसह त्या वास्तव्यास आहेत. परिसरात राहणारा मोहम्मद उजेबोद्दीन उर्फ रेहान मोहसिनोद्दीन याच्याशी त्यांची ओळख होती. १० मे रोजी रात्री सुमारे २ वाजताच्या सुमारास आरोपी रेहान याने फिर्यादीचा मुलगा शेख शेहामद याला फोन करून तुझा भाऊ शेहेजाद माझ्याशी भांडण करीत आहे, असे सांगितले. त्यानंतर शेख शेहामद व त्याचे वडील शेख अफसर घराबाहेर गेले. काही वेळाने घरी परतल्यानंतर त्यांनी इस्लाम चौकात कबुतराच्या कारणावरून वाद झाल्याचे व आरोपी रेहान याने मारहाण केल्याचे सांगितले. यानंतर दुसऱ्याच दिवशी ११ मे रोजी फिर्यादीच्या घराबाहेर पुन्हा वाद उफाळला. यावेळी आरोपी मोहम्मद उजेबोद्दीन उर्फ रेहान मोहसिनोद्दीन, मोहम्मद शोएब मोहम्मद युनुस व मोहसिनोद्दीन रम्मू डॉन हे तिघेही शेख अफसर यांच्याशी शिवीगाळ करत भांडण करू लागले. वाद वाढताच तिघांनी मिळून शेख अफसर यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. दरम्यान, आरोपी रेहान याने कमरेतून कोयता काढून शेख अफसर यांच्या उजव्या हातावर वार केला. या हल्ल्यात त्यांच्या हाताच्या कोपराजवळ गंभीर दुखापत झाली. पतीला वाचविण्यासाठी गेलेल्या सलमा बी यांनाही आरोपींनी शिवीगाळ करत मारहाण केली. घटनास्थळी उपस्थित फयाजउद्दीन नजमोद्दीन व मोहसिनोद्दीन जमिरोद्दीन यांनी हस्तक्षेप करून जखमींना आरोपींच्या तावडीतून सोडविले. त्यानंतर जखमी शेख अफसर यांना तातडीने पोलीस ठाण्यात आणून पुढे सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी खदान पोलिसांनी तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# एमआयडीसी परिसर अस्वच्छतेच्या विळख्यात

प्रतिनिधी १८ मे

**अकोला :** औद्योगिक वसाहत परिसरात अस्वच्छता दिसते. कचरा साचलेला असून देखील तो वेळीच उचलला जात नाही. त्यामुळे कामगार व या भागातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या भागातील विविध समस्या बाबतीत अकोला इंडस्ट्रीज असोसिएशनच्या पदाधिका-यांनी एमआयडीसी अधिकारी आणि जिल्हा प्रशासनाचे वेळोवेळी लक्ष वेधले परंतु अद्याप हा प्रश्न सुटला नाही. त्यामुळे नाराजी व्यक्त केली जात आहे. पुढे पावसाळा असून




त्यावेळी कचरा साचल्याने नवीन समस्या निर्माण होणार नाही याकडे आतापासूनच लक्ष देणे आवश्यक आहे.

# आमदार गजानन लवटे यांनी दर्यापूर आगाराला दिली अकस्मात भेट

प्रतिनिधी १८ मे

**दर्यापूर :** तेव्हा आगारातील कर्मचारी यांनी आगार व्यवस्थापक आषीश बाहुलकर यांच्या मनमानी कारभाराबाबत तक्रारी आमदार समोर मांडल्या दर्यापूर डेपोचे डेपो मॅनेजर हे दर्यापूर येथील रहिवासी असल्यामुळे हुकुमशाही पद्धतीने कर्मचाऱ्यासोबत वागतात स्वताचा परफॉर्मन्स चागला ठेवण्याकरिता कर्मचाऱ्याचे आर्थिक नुकसान करीत आहे जसे रजा बीनपगारी मंजूर करणे,रजा पेंडीग ठेवने व दोन महिन्यांचा कालावधी गेला की त्या रजा गहाळ करने त्याबाबत जाब विचारला की त्या कर्मचाऱ्यास खोटे प्रकरणात गोवुन दंडात्मक कारवाई करण्यात येते याबाबत आपले दुखने कर्मचाऱ्यांनी आमदार गजानन लवटे यांचे समोर मांडल्या तेव्हा उडवा उडवीची उत्तरे डेपो मॅनेजर यांनी दिली. तसेच अंजनगावच्या दररोज दोन ते तीन बस फेऱ्या दररोज रद्द होत असुन प्रवाशांची गैरसोय होत असल्याबाबत आमदार यांनी जाब विचारला असता कर्मचाऱ्यांमुळे होतात अशी खोटी माहिती दिली वास्तविक अशी आहे की अंजनगावच्या फेऱ्या रद्द करुन अकोट व अमरावती येथे जादा फेऱ्या काढल्या जातात एस टी चा चालक,



वाहक व यांत्रिक हा सध्या ४३,४४ या तापमानात प्रवासी सेवा करीत आहे अशा परीस्थिती डेपो मॅनेजर हे आर्थिक नुकसान करीत आहे. दम दाटीची वागणुक देत आहे,, त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आक्रोश निर्माण झाला आहे याचाच परिणाम म्हणून २ महिने अगोदर मानकर यांनी विभागीय कार्यालय अमरावती येथे आपल्या सहकाऱ्यांसह आमरण उपोषण केले होते डेपो मॅनेजर बाहुलकर यांना दर्यापूर डेपोला ३ वर्षे पूर्ण झाली आहे त्यांची प्रशासकीय बदली होने गरजेचे आहे व त्यांच्या हुकुमशाही कारभारामुळे कर्मचाऱ्यांनी बदलीची मागणी केली. यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर त्यानी सुद्धा बसेसच्या अनियमेत्तेबाबत आगार व्यवस्थापक बाहुलकर यांना चांगलेच धारेवर धरले.आमदार साहेबांनी कर्मचाऱ्यांच्या समस्या ऐकुन घेऊन न्याय मिळवून देण्याबाबत ग्वाही दिली. करीता उपस्थित रमेश मानकर, दिनेश गवई ,आषिश उखळकर, सचिन वडाळकर, योगेश कोकाटे आदी कर्मचाऱ्यांनी आमदार यांचे आभार मानले.

यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर, शिवसेना विधानसभा संघटक बबनराव विल्हेकर, युवासेना तालुकाप्रमुख सागर गिरे, किशोर टाले, गुणवंत पाटील गावंडे, दीपक बगाडे, गोपाल खलोकर, अनिकेत खाडे तसेच शिवसैनिक उपस्थित होते.

# जावयाचा मानपान आणि दानाची लगबग

प्रतिनिधी १८ मे

**अकोला :** ज्येष्ठ महिन्याचे कडक ऊन... दुपारच्या वेळी अंगाची लाहीलाही होत असतानाच, अकोल्याच्या बाजारपेठेत मात्र एक वेगळीच लगबग आणि उत्साह पाहायला मिळत आहे. कारण रविवार पासून विष्णूचा लाडका महिना म्हणजेच 'ज्येष्ठ अधिक मास' (पुरुषोत्तम मास) सुरू झाला आहे. दर तीन वर्षांनी येणारा हा काळ केवळ धार्मिक विधींचा नसून नात्यांमधील ओलावा आणि समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा एक कौटुंबिक सोहळा बनला आहे.

अधिक मासात '३३' या संख्येला विज्ञानासारखेच अढळ स्थान आहे. शहरातील मिठाईच्या दुकानांमध्ये सध्या खास अनारसे



आणि दिव्यांची आरास पाहायला मिळत आहे. जुन्या पिढीतील आजीबाईंपासून ते नवविवाहित तरुणींपर्यंत सगळेच ३३ अनारसे, ३३ दिवे किंवा पूजेच्या साहित्याची खरेदी करताना दिसत आहेत. 'हा केवळ धार्मिक विधी नाही, तर घरातल्या मोठ्यांच्या सुखासाठी आणि परंपरेचा वारसा पुढे नेण्यासाठी केलेली एक आनंदाची धडपड आहे,' असे खरेदीसाठी आलेल्या एका महिलेने चेहऱ्यावर हसू आणत सांगितले.

या महिन्याचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे जावयाला दिला जाणारा मानपान! लाडक्या जावयाला घरी बोलावून, त्याचे पाय धुवून, चांदीच्या किंवा तांब्याच्या ताटात ३३ अनारसे ठेवून 'वाण' देण्याची लगबग अकोल्यातील अनेक घरांमध्ये सुरू झाली आहे. मुलीचे सासरचे घर सुखी राहावे आणि जावयाशी असलेले नाते अधिक घट्ट व्हावे, हाच यामागचा मुख्य हेतू. अनेक माता-पिता वर्षभर या महिन्याची वाट पाहत असतात, जेणेकरून लेक-जावयाचे कोडकौतुक करता येईल. धर्माच्या पलीकडे जाऊन नात्यांना जोडणारा आणि कडक उन्हातही माणसाच्या मनातील माणुसकीचा झरा जिवंत ठेवणारा हा 'अधिक मास' अकोल्यात खऱ्या अर्थाने सकारात्मकतेची नवी ऊर्जा घेऊन आला आहे.

## उन्हाच्या झळांमध्ये दातृत्वाचा गारवा

### तीव्र उन्हात दातृत्वाचा 'पाणपोई' गारवा

◆ अकोल्यातील ज्येष्ठ महिन्याची ऊन सर्वांनाच ठाऊक आहे. अशा कडक उन्हात या अधिक मासाचे औचित्य साधून अनेकांनी दातृत्वाचा हात पुढे केला आहे. केवळ मंदिरांमध्ये दान न करता, रस्त्यावरून चालणाऱ्या प्रवाशांसाठी जागोजागी थंड पाण्याचे माठ (पाणपोई) ठेवणे, लिंबू सरबत वाटप करणे आणि गरजू लोकांना रसाळ फळे तसेच धान्य देणे याला यंदा प्राधान्य दिले जात आहे. दिवसभराच्या उष्णतेनंतर संध्याकाळी मंदिरे आणि नदीकाठ दिव्यांच्या प्रकाशाने उजळून निघत आहेत. घरातील दुःख, गरिबी आणि नकारात्मकता दूर व्हावी म्हणून नदीकाठावर आणि मंदिरांमध्ये तुपाचे दिवे लावले जात आहेत. हा केवळ अंधार दूर करणारा प्रकाश नाही, तर अकोलेकरांच्या मनात उद्याच्या सुख-समृद्धीची नवी आशा निर्माण करणारा एक आशेचा किरण आहे.

# शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांच्या तीन सीईटींची आता एकच संयुक्त सीईटी

## ◆ २०२७-२८ पासून अंमलबजावणी

प्रतिनिधी १८ मे

**पुणे :** राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुटसुटीत करण्यासाठी राज्य समाइक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल) प्रयत्न करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आता बीएड, बीपीएड आणि बीएड-एमएड या अभ्यासक्रमांसाठीच्या स्वतंत्र प्रवेश परीक्षा बंद करण्यात येणार असून, एकच संयुक्त सीईटी घेण्यात येणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून करण्यात येणार आहे.

'सीईटी' कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई यांनी याबाबतची माहिती दिली. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या सूचनेनुसार 'सीईटी सेल'च्या माध्यमातून विद्यार्थीकेंद्रित निर्णयांवर भर देण्यात येत आहे. 'सीईटी सेल'कडून व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांची प्रक्रिया राबवण्यात येते. त्यात सुमारे १८ विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा घेतल्या जातात. त्यांपैकी बीएड, बीपीएड आणि बीएड-एमएड (एकात्मिक) या तीन पदवी अभ्यासक्रमांसाठी स्वतंत्र प्रवेश परीक्षा घेतल्या जातात. त्यामुळे उमेदवारांना स्वतंत्रपणे अर्ज, शुल्क भरावे लागते. तसेच, तिन्ही अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रयत्न करू इच्छिणाऱ्या उमेदवारांना तिन्ही परीक्षा द्याव्या लागतात. त्यात वेळ आणि प्रवासावर खर्च करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर, प्रवेश परीक्षांची प्रक्रिया सुटसुटीत करण्यासाठी सीईटी सेलकडून परीक्षांचे एकत्रीकरण करण्यात येत आहे. बीएड, बीपीएड आणि बीएड-एमएड (एकात्मिक) या तीन परीक्षांच्या एकत्रीकरणाच्या निर्णयामुळे राज्यातील हजारो उमेदवारांचा वेळ आणि खर्च वाचणार आहे. तसेच, प्रशासनाच्या पातळीवरही परीक्षा नियोजन, केंद्र व्यवस्थापन, निकाल प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी मदत होणार आहे. बीएड, बीपीएड आणि बीएड-एमएड अभ्यासक्रमांसाठी आता स्वतंत्र सीईटी न घेता त्यांचे एकत्रीकरण करण्यात येणार आहे. त्यातील गुणांच्या आधारे प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना एकाच परीक्षेच्या माध्यमातून त्यांच्या पसंतीचा अभ्यासक्रम निवडण्याची मुभा मिळणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK